मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 ❊ वर्ष २५ ❊ अंक २२९ ❊ सातारा ❊ शनिवार, दि. २७ एप्रिल २०२४ ❊ पाने ६ (सुप्रभात) ❊ किंमत ५/- रूपये

भाजपचे डावपेच; पण 'किसमे कितना हैं दम'!

वृत्त पान ३ वर...

सोलापूरचा आबा कांबळे खून खटला

वृद्ध पैलवानासह सातजणांना जन्मठेप

सोलापूर : सोलापूर येथील दोन तालमींमध्ये झालेल्या भांडणातून स्वतः च्या मुलाच्या झालेल्या खुनाचा सूड उगविण्यासाठी मुलाच्या मारेकऱ्याचा निर्घृणपणे खून केल्याबद्दल वयोवृद्ध पैलवानासह सातजणांना सोलापूरच्या सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. या गाजलेल्या खटल्याकडे सोलापूरकरांचे लक्ष होते.

पत्रा तालीम आणि पाणीवेस तालीम या दोन तालमीतील भांडणातून पूर्वीच्या खुनाचा सूड उगविण्यात आला होता. यात पत्रा तालीम भागात राहणाऱ्या सत्यवान ऊर्फ आबा कांबळे (वय ३६) याचा ७ जुलै २०१८ रोजी रात्री नव्या पेठेजवळील डाळिंबी आडलगत मोबाईल गल्लीत कोयत्यांनी सपासप वार करून खून झाला होता. या खटल्यात सुरेश अभिमन्यू शिंदे ऊर्फ गामा पैलवान (वय ७४, रा. पाणीवेस तालीम) याच्यासह त्याचे साथीदार गणेश ऊर्फ अभिमन्यू चंद्रशेखर शिंदे (वय ३२, निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर),

मृत सत्यवान ऊर्फ आबा कांबळे

रविराज दत्तात्रेय शिंदे (वय ३२), प्रशांत ऊर्फ आप्पा पांडुरंग शिंदे (वय ३६, दोघे रा. शाहीर वस्ती, भवानीपेठ, सोलापूर), नीलेश प्रकाश महामुनी (वय ४५, रा. दत्त चौक, सोलापूर), तौसीफ गुडूलाल विजापुरे (वय २७, रा. मेहताबनगर, मुळेगाव रोड, सोलापूर) आणि विनित ऊर्फ ईश्वर भालचंद्र खाणोरे (वय ३१, रा. पुणे) या सात आरोपींना जिल्हा सत्र न्यायाधीश संगीता शिंदे यांनी दोषी धरून जन्मठेप आणि इतर कलमांखाली शिक्षेसह प्रत्येकी १७ हजार रुपये दंड ठोठावला.

पत्रा तालीम आणि पाणीवेस तालमीत २००४ साली शिवजयंती मिरवणुकीत धक्का लागल्याच्या क्षुल्लक कारणावरून भांडण झाले होते. त्यातूनच पाणीवेशीतील सुरेश ऊर्फ गामा पैलवान याचा मुलगा ऋतुराज याचा खून झाला होता. त्या खटल्यात पत्रा तालमीच्या सत्यवान ऊर्फ आबा कांबळे याच्यासह दहाजणांना जन्मठेपेची शिक्षा झाली होती. परंतु २०१४ साली मुंबई उच्च न्यायालयात अपिलामध्ये सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता झाली होती. त्यामुळे गामा पैलवान व त्याचै साथीदार चिडले होते. मृत आबा कांबळे हा डाळिंबी आडजवळ मोबाईल गल्लीत मोबाईल विक्री आणि दुरुस्तीचा व्यवसाय करीत होता. ७ जुलै २०१८ रोजी तुरळक पाऊस पडत असताना आबा कांबळे हा दुकानाजवळ आडोशाला थांबला असताना दुचाकी गाड्या उडवत आलेल्या आरोपींनी आबा कांबळे याच्यावर कोयत्यांनी हल्ला केला. तेव्हा जीव वाचविण्यासाठी तो पळत असताना पाठलाग करून त्याच्यावर सपासप ५६ वार करण्यात आले.

ही सर्व थरारक घटना तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद झाली होती. मृत कांबळे याचे रक्ताने माखलेले कपडे, गुन्ह्यात वापरलेल्या कोयत्यावरील रक्ताचे डाग तपासले असता ते मिळतेजुळते निघाले. सीसीटीव्ही फुटेजचा अस्सलपणा पुढे आला. या खटल्यात २८ साक्षीदार तपासले गेले. यात फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संजय जगताप, तत्कालीन सहायक पोलीस आयुक्त डॉ. दीपाली काळे, फिर्यादी शुभम धुळराव तसेच वैद्यकीय आणि रासायनिक पृथःकरणाशी संबंधित तज्ज्ञ अधिकाऱ्यांची साक्ष महत्वाची ठरली. सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत तर आरोपींतर्फे ॲड. श्रीकांत जाधव, ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. झुरळे यांनी काम पाहिले.

ठोसेघर येथे एकाचा डोक्यात दगड घालून निर्घृण खून

अल्पवयीन मुलाला पोलिसांनी घेतले ताब्यात

सातारा / प्रतिनिधी

ठोसेघर, ता. सातारा येथील सुरेश विठ्ठल जाधव (वय ४३) यांचा डोक्यात दगड घालून निर्घृण खून करण्यात आला. या प्रकरणी एका अल्पवयीन मुलाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ही धक्कादायक घटना बुधवारी रात्री साडेदहा वाजता ठोसेघर येथे घडली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, सुरेश जाधव हे गवंडी काम करायचे. मात्र, ते एकटेच राहत होते. बुधवारी रात्री ते घरात झोपले होते. त्यावेळी एका अल्पवयीन मुलाने त्यांच्या डोक्यात दगड घालून त्यांचा खून केला. गुरुवारी सकाळी हा प्रकार निदर्शनास आला. यानंतर पांगारे येथील पोलिस पाटील यांनी याची माहिती सातारा तालुका पोलिसांना दिली. पोलिस निरीक्षक अरविंद काळे यांनी तत्काळ आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक लोकांशी पोलिसांनी चर्चा केल्यानंतर हा खून एका अल्पवयीन मुलाने केला असल्याचे पोलिसांना समजले. त्यानंतर पोलिसांनी संबंधित मुलाला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने वारंवार दारू पिऊन त्रास देत असल्यामुळे हा खून केला असल्याची कबुली दिली. सातारा तालुका पोलिस ठाण्यात संबंधित अल्पवयीन मुलावर गुन्हा दाखल झाला असून, पोनि अरविंद काळे हे अधिक तपास करीत आहेत.

मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीचा लोणंद पोलिसांकडून पर्दाफाश; तिघे ताब्यात

लोणंद : मागील काही महिन्यात लोणंद पोलीसात दाखल असलेल्या गुन्हयाचा तपास करीत असताना लोणंद पोलिसांनी तीन जणांच्या टोळीला ताब्यात घेवून त्यांच्याकडून तीन मोटारसायकली जप्त करण्यात यश मिळवले आहे.

लोणंद पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार यांनी घडलेल्या गुन्हयांबाबत गोपणीय खबऱ्यांमार्फत माहीती मिळवुन मिळाले माहीतीचे आधारे यातील आरोपी निष्पन्न केले आहेत. दिनांक २३/०४/२०२४ रोजी यातील दोन आरोपीचा ठावठिकाणा मिळताच सहायक पोलीस निरिक्षक सुशिल भोसले व गुन्हे प्रकटीकरण पथकाने यातील दोन आरोपी ताब्यात घेतले. आरोपींकडे अधिक विचारपुस केली असता त्यांनी व त्यांचा आणखी एक साथीदारांनी मिळून लोणंद गावचे हद्दीतील दोन मोटार सायकली चोरी केलेची कबुली दिली आहे.

सदर प्रकरणी सचिन दादु (पान २ वर)

थोडक्यात

'केट्स पॉईंट' वरून उडी घेऊन एकाची आत्महत्या

महाबळेश्वर : महाबळेश्वर शहरापासून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या 'केट्स पॉईंट'च्या कड्यावरून गुजरात येथील पर्यटक अनिल अग्रवाल (वय ६६, रा. अहमदाबाद, पालडी, गुजरात) येथील पर्यटकाने बुधवारी रात्री ७ वाजण्याच्या सुमारास आत्महत्या करून आपल्या जीवनचा शेवट केला.

याबाबत पांचगणी पोलिस ठाण्याकडून मिळालेली माहिती अशी की, बुधवारी सायंकाळी सात च्या सुमारास केटस् पॉईंट, महाबळेश्वर येथील निडल होल येथील कड्यावरून एक अनोळखी पुरूषाने कड्यावरून उडी मारून आत्महत्या केली असल्याचे काही पर्यटकांनी पाहिले. त्यांनी ही माहिती तेथील वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना दिली. बुधवारी रात्री उशीर झाल्याने त्या पर्यटकाचा शोध घेता आला नाही. गुरुवारी सकाळी महाबळेश्वर ट्रेकर्सच्या जवानांनी कड्यात उतरण्याचा निर्णय घेतला. सकाळी महाबळेश्वर ट्रेकर्सला खोल दरीत एक मृतदेह आढळून आला. ट्रेकर्सच्या जवानांनी खोल दरीतून पर्यटकाचा मृतदेह बाहेर काढला.

वाठार स्टेशन परिसरात वादळासह पाऊस

कोरेगाव : दुष्काळी कोरेगाव तालुक्याच्या उत्तर भागात आज सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसाने झोडपून काढले त्यामुळं गेली काही दिवसातउखाड्याने हैराण झालेल्या जनतेला दिलासा मिळाला.

आज सायंकाळी ६ वाजता या भागतील वाठार स्टेशन, देऊर गावात वादळी वाऱ्यासह गारा पडल्या दोन तास पडलेल्या या पावसाने हवेत गारवा निर्माण झाला असून ग्रामीण भागातील जनतेतून या बद्दल समाधान व्यक्त होत आहे.या पावसाने काही ठिकाणी झाड पडली त्यामुळे या भागातील अनेक गावातील विद्युत प्रवाह खंडित झाला आहे.

पियुष गोयल यांच्या विरोधात बातमी छापल्याने 'नवाकाळ'च्या पत्रकाराला धमकी

मुंबई/प्रतिनिधी

मुंबई उत्तर मतदारसंघातील भाजपचे उमेदवार केंद्रायमंत्री पियुष गोयल यांच्या ''गोयल यांना सोसवेना मासळीचा वास'' या मथळ्याखाली दैनिक नवाकाळमध्ये बातमी प्रकाशित झाल्यानंतर काही अज्ञात कार्यकर्त्यांनी संबंधित बातमी देणाऱ्या प्रतिनिधीला धमकावल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधितांवर कडक कारवाई करावी,अशी मागणी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, सरचिटणीस प्रविण पुरो यांनी केली आहे. मुंबई प्रेस क्लब, मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई हिंदी पत्रकार संघासह अनेक संघटनांनी या घटनेचा निषेध केला आहे.

उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी बोरिवली (प) येथिल बाभई व वझिरा येथे प्रचार करताना माशांचा वास (पान २ वर)

शरद पवार यांची आज पाटणमध्ये जाहीर सभा

पाटण : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरदचंद्र पवार हे शनिवार दिनांक २७ एप्रिल २०२४ रोजी सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. सातारा लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार शशिकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची शनिवारी दुपारी ३ वा. पाटण येथील जुन्या ग्रामपंचायत मैदानावर जाहीर सभा होणार आहे अशी माहिती पाटण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (पान २ वर)

लग्न सोहळ्याला निघालेल्या कारला अपघात

▪ अपघातात दोन महिलांचा मृत्यू; चालकासह चार महिला गंभीर जखमी

वडगाव मावळ / प्रतिनिधी

मावळ तालुक्यातील पुणे मुंबई महामार्गावर एक भीषण अपघाताची घटना घडली आहे कार्ला येथील सामुदायिक विवाह सोहळ्याला जाणाऱ्या इनोवा कारचे डाव्या बाजूचे चाक निघाल्याने कार पलटी होऊन भीषण अपघात झाला.या अपघातात एक तरुणी व ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला आहे तर चालकासह चार महिला गंभीर जखमी झाल्या. हा अपघात शुक्रवारी (दि.२६) सकाळी ९:३० वा. अहिरवडे फाटा, पुणे-मुंबई महामार्ग, ता. मावळ हद्दीत घडला.

सिद्धी संतोष तिकोणे (वय १८, रा. पाटण, ता. मावळ) व सीताबाई तुकाराम लालगुडे (वय ६०, रा. कुसगाव खुर्द, ता. मावळ) असे अपघातात मृत्यू पावलेल्यांची नावे आहेत.

पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार कार्ला येथे सामुदायिक विवाह सोहळ्याला कार मधून जात असताना, अहिरवडे हद्दीत पुणे मुंबई महामार्गावर कार चा डाव्या बाजूचा समोरचा चाक निघाल्याने कार अनेकदा पलटी होऊन भीषण अपघात झाला.

या अपघातात सिद्धी तिकोणे व सीताबाई लालगुडे या गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच कामशेत पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक जयश्री भूमकर, पोलीस हवालदार समीर करे व प्रवीण विरणक आदींनी धाव घेतली. जखमींवर पवना हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

सावध रहा, नाही तर फोटो 'व्हायरल' करीन : सतेज पाटील

कोल्हापूर : मी संजय मंडलिक यांना सातत्याने सांगत आलो आहे, गादी विषयी काही बोलू नका. जे काय बोलायचे असेल तर सतेज पाटलांच्यावर बोला काही अडचण नाही. तुम्हाला उत्तर द्यायला मी खंबीर आहे. शाहू महाराजांचा सन्मान राखा विनाकारण काही बोलू नका . नाहीतर माझ्या कडे तुमचा फोटो माझ्याकडे आहे तो मी व्हायरल करेन, मग मात्र तुमची पंचायत होईल असा गर्भित इशारा सतेज पाटील यांनी खासदार संजय मंडलिक यांना दिला.

कोल्हापूरच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे प्रचाराच्या अंतिम टप्प्यात राजकीय पक्षातून एकमेकावर तोफा डागल्या जात आहेत. कोल्हापूमध्ये शाहू महाराज छत्रपती महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. शाहू महाराज आणि खासदार संजय मंडलिक थेट लढत होत आहे. मंडलिक यांनी आपल्या प्रचारसभेत थेट शाहू महाराज यांच्यावर टीका केली होती. मंडलिक यांच्या टीकेला आ. सतेज पाटील यांनी उत्तर दिलं असून त्यांना इशारा दिला आहे. खा. संजय मंडलिक यांनी शाहू महाराज यांच्यावर टीका केली होती. त्यावरून सतेज पाटील यांनी त्यांना त्यांचे फोटो व्हायरल करण्याचा इशारा दिला आहे.

कोल्हापूरच्या गादी बद्दल काही लोकप्रश्न करत आहेत. मी संजय मंडलिक यांना सातत्याने सांगत आहे, गादीवर बोलू नका. बंटी पाटलावर बोला काही अडचण नाही. तुम्हाला उत्तर द्यायला हा पाटील खंबीर आहे. शाहू महाराजांचा सन्मान राखा तुम्ही सावध राहा. ज्यावेळी २०१९ ला निवडणुकीला उभा होता. (पान २ वर)

कोरेगाव पार्क परिसरात आलिशान कारने १०-१५ दुचाकींना उडवले

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहरातील कोरेगाव पार्क पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कॅम्प परिसरात दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. भरधाव वेगातील आलिशान कारने रस्त्याच्या दुतर्फा पार्क केलेल्या दहा ते पंधरा गड्यांना धडक दिली. यामध्ये एक व्यक्ती गंभीर जखमी झालाय.

आलिशान चार चाकी वरील चालक रविंद्र धनवडे (वय ३२ वर्ष, राहणार शिर्डी जिल्हा अहमदनगर) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. गाडी चालवत असताना फिट आल्याने हा अपघात झाल्याचे समोर आले आहे. या अपघातात मोहम्मद अनिस शौकत अली (पान २ वर)

निवडणूक पारदर्शक व निर्भयपणे पाडण्यावर प्रशासनाचा भर - जितेंद्र डुडी

सातारा : सातारा लोकसभा मतदार संघात निवडणूक पारदर्शक व निर्भयपणे पार पाडण्यासाठी प्रशासनाचा भर असून आचारसंहितेचा कोणी भंग किंवा प्रलोभन देत असल्यास त्याची तक्रार नागरिकांनी १९५० या क्रमांकावर किंवा सी व्हीजल ॲपवर तात्काळ तक्रार करावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या पत्रकार परिषदेला उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे उपस्थित होते.

१९५० व सी व्हीजल ॲपवर आलेल्या तक्रारींचा निपटारा प्रशासनाकडून लवकरात

लवकर करण्यात येतो, असे सांगून जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. डुडी म्हणाले, येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रशासन तयार आहे.

सातारा जिल्ह्यात सेवा बजावणारे मतदार मोठ्या संख्येने आहेत. पोस्टल बॅलेट पेपर पोहचविण्यात आले आहेत. ८५ वर्षावरील वृद्ध व दिव्यांग मतदारांना गृह भेटीतून मतदानाचा पर्याय देण्यात आलेला आहे. बऱ्याच मतदारांनी मतदान केंद्रावर जावून मतदान करणे हा आमचा हक्क असून मतदान केंद्रांवर जावून मतदान करणार असल्याचे सांगितले आहे ही एक अभिमानाची बाब आहे.

१ पासून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. नवमतदार नोंदणी कार्यक्रमात तरुणांची मोठ्या प्रमाणात नोंदणी झाली आहे. हे जास्तीत जास्त मतदार मतदान करतील यासाठी महाविद्यालयांतील प्राचार्यांशी समन्वय ठेवण्यात येत आहे.

सातारा लोकसभा मतदार संघासाठी येत्या ७ मे राजी सकाळी ७ ते सायं. ६ या वेळेत मतदान होणार आहे. या दिवशी शासनाने सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. सातारा जिल्ह्यातील नागरिक, महिला, तरुणांनी पुढे येऊन मोठ्या संख्येने मतदान करुन जिल्ह्याचा मतदानाचा टक्का वाढवावा.

मंगळसूत्राला हात

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पूर्ण झाले असून दुसऱ्या टप्प्यातील मतदानासाठी अवघे काही तास उरले आहेत. तापमानातील पारा जसा चढतो आहे, तसाच वक्तृत्वामुळे राजकीय तापमानातही वाढ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजस्थानातील बांसवाडा येथे काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर हल्ला केला. त्यांनी संपत्ती वाटपाची योजना घुसखोर आणि अधिक मुले असलेल्या लोकांमध्ये वाटण्याचे षड्यंत्र असल्याचे म्हटले. मोदी यांनी त्यानंतर हनुमान जयंतीला केलेले भाषण पाहता त्यांनाही आता मतांच्या ध्रुवीकरणाची गरज वाटायला लागली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही काँग्रेसवर मुस्लिम तुष्टीकरणाचा आरोप केला आहे. शरिया आणि तिहेरी तलाक पुन्हा लागू करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेसला जे साठ वर्षात जे काम करता आले नाही, ते दहा वर्षात केल्याचे सांगणारा भाजप अटलबिहारी वाजपेयी यांच्या सहा वर्षांच्या कारकिर्दीकडेही सोईस्कर दुर्लक्ष करतो आहे. एवढे काम केले असेल, तर मोदी-शाह यांना हिंदु-मुस्लिम, मंगळसूत्र इतक्या खालच्या पातळीवर जाण्याची गरज नाही. शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांच्या गटाने मशाल गीतात 'जय भवानी'चा उल्लेख केला, तर नोटीस बजावणार निवडणूक आयोग मोदी-शाह यांच्या धार्मिक तुष्टीकरणाच्या मुद्यांवर मौन बाळगून का आहे? विरोधी पक्षांनी सात मुद्दयांच्या आधारे केलेल्या तक्रारीवर साधे म्हणणे मांडण्याची नोटीसही निवडणूक आयोग बजावत नसेल, तर निवडणूक आयोगाच्या निपक्षपातीपणाबद्दल संशय घ्यायला जागा राहते. मोदी यांचे भाषण बारकाईने पाहिले, ऐकले, तर त्यात उघडउघड ध्रुवीकरणाचा हेतू दिसतो. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग आता आजारी आहेत. ते उत्तर देऊ शकत नाहीत, अशा वेळी त्यांच्या एखाद्या विधानाचा अर्धवट आधार घेऊन त्यांच्यावर आणि काँग्रेसवर मुस्लिमधार्जिणे असल्याचा आरोप करणे हे मानवतेलाही धरून नाही. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी मोदी यांच्यावर कठोर टीका करत, त्यांची विधाने एका विशिष्ट समुदायाच्या विरोधात असल्याचे म्हटले. तथापि, भाजपने मोदी यांनी फक्त सिंग यांच्या संसाधनांवर पहिला हक्क मुस्लिमांचा आहे, या विधानाची केवळ आठवण करून दिली होती, असे सांगितले. राहुल गांधी वारंवार निवडणूक मूलभूत प्रश्नांवर नेण्याचा प्रयत्न करीत असताना भाजप मात्र पुन्हा पुन्हा ती धार्मिक ध्रुवीकरणावर नेत आहेत. विकासकामांवर लोक मतदान करीत नाहीत, की गेल्या दहा वर्षांतील विकासकामांवर लोक खूश नाहीत, असे भाजपला वाटते. शाह हे तर काँग्रेसच्या साठ वर्षांची आणि भाजपच्या दहा वर्षांच्या कामाची आकडेवारी सभातून सांगत असताना त्यांना हिंदू-मुस्लिमांचा मुद्दा महत्त्वाचा का वाटतो? एवढी विकासकामे केली, तर काँग्रेस सत्तेत येणारच नसतील, तर महिलांच्या मंगळसूत्राला हात घालण्याची भीती का वाटते, हे प्रश्न अनुत्तरीत राहतात.

भारतीय निवडणुकांमध्ये संयम सोडणे ही नवीन गोष्ट नाही, 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' अशा घोषणा देणाऱ्या पंतप्रधानांनी भारतातील १४० कोटी जनतेला लक्ष्य करणे, विरोधकांच्या जाहीरनाम्याची भीती दाखवणे योग्य नव्हते. आपल्या देशाच्या आर्थिक-सामाजिक जडणघडणीत, खेडेगावात आणि शहरामध्ये, धर्मापेक्षा जात आणि लिंगभेदाला अधिक महत्त्व आहे, मग तो हिंदू असो, मुस्लिम असो, शीख असो, ख्रिश्चन असो; गावे मागासलेली आहेत, शहरे पुढे आहेत. महिला मागास आहेत, पुरुष पुढे आहेत. वंचित समाजात पसमांदा मुस्लिम बहुसंख्य आहेत आणि हिंदू सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत, त्यामुळे पंतप्रधानांचे हे विधान निश्चितच धक्कादायक आहे. डॉ. सिंग यांचे भाषण इंग्रजीत होते आणि मोदी यांचे भाषण हिंदीत होते. त्यांनी ज्या भाषणाचा संदर्भ दिला, ते वेगळ्या भाषेत होते. मोदी यांनी सिंग यांच्या भाषणाचा हिंदीत अनुवाद करताना त्याचा चुकीचा अर्थ काढला गेला. डॉ. सिंग यांचे विधान भारतातील वंचिताबद्दल होते. त्यात आदिवासी, दलित, पसमंदा इत्यादींचा उल्लेख होता. आता त्यातून एक तुकडा काढून संदर्भ बदलला. डॉ. सिंग यांचे विधान जुनी गोष्ट आहे. मोदी यांच्या भाषणाचे समर्थन करणे ही निष्ठेची बाब आहे. कुठलाही हिशोब नाही, वही नाही, नेता जे म्हणेल तेच योग्य आहे, अशी अंधभक्तांची मानसिकता आहे. समाजशास्त्रज्ञांच्या दृष्टिकोनातून पंतप्रधानांच्या विधानात तथ्य नाही. त्यांच्या समर्थकांच्या दृष्टिकोनातून मोदी यांचे विधान अतिशय स्फोटक आहे, त्यातून काँग्रेसच्या जाहीरनाम्यात दडलेले तुष्टीकरण उघड झाले आहे. डॉ. सिंग यांचे विधान दहा वर्षांपूर्वीचे आहे. गेल्या दहा वर्षांपासून त्यांचे काँग्रेस पक्षाच्या धोरणनिर्मितीत कोणतेही योगदान नाही. शिवाय ते आजारी आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विधानांची मोडतोड करून मांडणे सर्वथा गैर आहे. एकीकडे हेच मोदी सिंग यांचे कौतुक करतात आणि तेच आता त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करतात. सध्याच्या सरकारने उज्ज्वला, शौचालय बांधणे किंवा खाते उघडणे यात हिंदूंना प्राधान्य दिले नाही, मुस्लिमांना वंचित ठेवले नाही, जे काही केले ते सर्वांसाठी केले आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी काय केले आणि ते काय बोलले यात थोडे अंतर आहे. हा ध्रुवीकरणाचा प्रयत्न असू शकतो; मात्र पंतप्रधानांनी डॉ. सिंग यांच्या १० वर्षांची आणि भाजपच्या १० वर्षांची तुलना, भाजपचा जाहीरनामा आणि काँग्रेसचा जाहीरनामा यांचे विश्लेषण करायला हवे होते. घोषणापत्रातून एखादी घटना उचलून दहा वर्षांपूर्वीच्या भाषणाशी जोडणे गैर आहे.

सच्चर समितीपासून ते कुरेशी समितीपर्यंत जे अभ्यास आले आहेत, त्यात शिक्षण, नोकरी, मालमत्ता आणि रोजगार इत्यादी बाबतीत मुस्लिम समाज हा मागासलेला आहे, यावर शिक्कामोर्तब झाले आहे. भारतातील हिंदू, बौद्ध आणि शीख यांच्या ते पुढे नाहीत. डॉ. सिंग यांचे सरकार भारतात क्रोनी-भांडवलशाहीला प्रोत्साहन देण्यासाठी कुप्रसिद्ध आहे. त्यांच्या राजवटीत झालेल्या घोटाळ्यांमुळे त्यांचे सरकार कोसळले. अण्णा हजारे यांचे आंदोलन झाले, लोकपालाची चर्चा झाली. यावर मोदी यांना टीका करता आली असती; परंतु सिंग यांच्या त्या वेळच्या विधानाला कोणताही आधार आणि परिणामही नव्हता, त्यामुळे त्याला फार महत्त्व देण्याची गरज नव्हती. पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा राष्ट्रपती या पदांवर कोणीही असले, तरी त्यांनी थोडा संयम बाळगावा आणि त्यांच्या पदाचा आदर करावा अशी अपेक्षा असते. जर त्यांनी संयम पाळला नाही, आदर दाखवला नाही, विशिष्ट पक्षाचा नेता म्हणून काम केले, तर सर्व शिष्टाचार संपेल. खुद्द पंतप्रधानांनी त्यांची लक्ष्मणरेषा काढावी. मोदी मुख्यमंत्री असताना त्यांच्याभोवती संशयाचे वर्तुळ होते. पंतप्रधान या नात्याने त्यांनी अरब देश, मुस्लिम समुदाय, अल्पसंख्यांकांसह सर्वांच्या हिताची बात केली, ही चांगली गोष्ट आहे; परंतु त्यांचे आताचे विधान निषेध करण्यासारखेच आहे. हिंदू मत खूप गुंतागुंतीचे असते. जेव्हा आपण हिंदू मतांबद्दल बोलतो, तेव्हा याचा अर्थ दलित मत, महिला मत, ग्रामीण मत, मागास मत, उच्चवर्णीय मत असा होतो. हिंदू मत ही एक अतिशय गुंतागुंतीची आणि कृत्रिम संज्ञा किंवा विशेषण आहे. त्यांना एकत्र आणण्यासाठी मुस्लिमांवर हल्ला करणे किंवा मुस्लिमांना काँग्रेसचा पाळीव गट म्हणणे हा सोपा मार्ग आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी काँग्रेसचा जाहीरनामा वाचण्यासाठी त्यांच्या दौऱ्यात वेळ काढला, तर काँग्रेसजनांनाच धक्का बसेल. त्यात ठोस सूचना, कालबद्ध आश्वासने आणि मागील सरकारच्या चुका सुधारण्याचा प्रयत्न आहे. भाजपच्या जाहीरनाम्याचीही तुलना व्हायला हवी. मतदार हा अतिशय हुशार आहे. प्रश्न तटस्थ मतदारांना आपला मुद्दा समजावून सांगण्याचा आहे. हे करण्याचे दोनच मार्ग आहेत. तुमची रेषा मोठी करा किंवा दबंगगिरी करून दुसऱ्याची रेषा लहान करा. मोदी दुर्दैवाने दुसरा मार्ग अवलंबत आहेत.

पान १ वरून

...कारने १०-१५ दुचाकींना उडवले

खत्री (वय २९ राहणार, मध्य प्रदेश) हा जखमी झाला आहे. त्याच्या पायावर गाडी जाऊन तो त्या गाडीची धडक बसुन त्याचे पायावरून गाडीचे चाक जावून तो जखमी झाला. त्यास जहांगीर हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले आहे. सदर गाडी चालकास लष्कर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. परिस्थिती शांत आहे.

शरद पवार यांची शनिवारी...

पार्टी-शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष राजाभाऊ शेलार यांनी पत्रकाद्वारे दिली. या सभेला राज्याचे माजी मुख्यमंत्री आ.पृथ्वीराज चव्हाण, माजी खासदार श्री. श्रीनिवास पाटील, पक्षाचे जेष्ठ नेते व माजी मंत्री श्री.विक्रमसिंह पाटणकर, माजी मंत्री आ.श्री.बाळासाहेब पाटील, उ.बा.ठा.शिवसेना उपनेते नितीन बानुगडे, सातारा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार श्री.आ.शशिकांत शिंदे, सातारा जिल्हा मध्य. सह. बँकेचे संचालक श्री.सत्यजितसिंह पाटणकर (दादा),श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ.भारत पाटणकर, रयत सहकारी साखर कारखाने चेअरमन श्री.उदयसिंह पाटील -उंडाळकर, उ.बा.ठा. शिवसेना सातारा जिल्हा अध्यक्ष श्री.हर्षद उर्फ भानुप्रताप कदम, राष्ट्रीय काँग्रेसचे प्रांतिक प्रतिनिधी श्री.हिंदुराव पाटील त्याचबरोबर महाविकास आघाडीतील मित्रपक्षांचे सर्व जिल्हा अध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी या सभेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना, श्रमिक मुक्ती दल, शेकाप आणि महाविकास आघाडीतील घटक मित्र पक्षांच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहनही शेवटी या पत्रकात केले आहे.

सावध रहा, नाही तर फोटो 'व्हायरल'...

त्यावेळी महाराजांच्या पाया पडायला गेला होता. महाराजांच्या पाया पडतानाचे फोटो माझ्याकडे आहेत, ते फोटो व्हायरल करेन, मग अडचण होईल त्यामुळे सन्मान राखा असा सल्ला सतेज पाटील यांनी दिला. एकप्रकारे सतेज पाटील यांनी संजय मंडलिक यांना पराभूत करू असा दावा आपल्या इशाऱ्यातून दिला आहे. आमच्यावर बोला. आम्ही राजकारणात कसलेले पैलवान आहोत. शाडू मारून मैदानात उतरलोय पुढच्याला कुणाला घाबरत नाही. माती एकदा अंगावर घेतली तर पुढच्याला चितपट केल्याशिवाय गप्प बसणार नाही, असं पाटील म्हणाले.

मोटारसायकल चोरणाऱ्या टोळीचा...

पोटोळे (वय २० वर्षे रा. दरुज ता. खटाव जि. सातारा, अशोक शंकर पाटोळे वय २० वर्षे रा. दरुज ता. खटाव जि. सातारा व अनिकेत रमेश जाधव १९ रा. दरजाई ता. खटाव जि. सातारा अशा तीन संशयितांकडून चोरी केलेल्या दोन मोटारसायकली व गुन्हा करताना वापरलेली एक स्प्लेंडर मोटारसायकल अशा तीन मोटारसायकली एकुण २,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईत वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार लोणंद पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सुशिल भोसले यांच्यासह इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

पियुष गोयल यांच्या विरोधात बातमी...

सहन न झाल्याने नाकाला रूमाल लावला होता.या घटेनेची बातमी नवाकाळ या दैनिकात १४ एप्रिल रोजी प्रसिद्ध झाल्यानंतर मुंबई काँग्रेसने कांदिवली येथे पियुष गोयल यांच्या कार्यालयासमोर निदर्शने केली.पियुष गोयल यांच्या संदर्भात '' पियुष गोयल यांना सहन होईना मासळीचा वास'' ही बातमी नवाकाळ मध्ये छापून आल्याने दुखावलेल्या भाजपच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत काल सोमवारी रात्री १० वाजता नवाकाळच्या पत्रकार नेहा पुरव यांच्या बोरीवलीतील घरी जावून,पुन्हा मच्छिमारांची बातमी आली नाही पाहिजे असे धमकावले.पत्रकार नेहा पुरव यांना दिलेल्या या बातमीचे तीव्र पडसाद उमटले आहेत. काँग्रेसचे सरचिटणीस सचिन सावंत यांनी याचा निषेध करीत संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी मुंबईचे पोलीस आयुक्त यांच्याकडे केली आहे.काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी धमकी देणा-या गुंडांना अटक करण्याची मागणी केली आहे.माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहेत. महाराष्ट्राला निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारितेचा मोठा वारसा आहे. स्वातंत्र्यपूर्वीपासून महाराष्ट्राच्या भूमितीतील पत्रकारांनी लोकशाहीला समृद्ध करण्याचे आणि दिशा देण्याचे कार्य केले आहे पण केंद्रातील भाजप सरकारला लोकशाही नको आहे.म्हणून त्यांनी लोकशाहीचे चारही स्तंभ आणि स्वायत्त संस्थावर हल्ले करणे सुरु केले आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल भाजपची हीच कार्यपद्धती पुढे घेऊन जात आहेत.हायप्रोफाईल कुटुंबातून आलेल्या गोयल यांना मासळीचा वास आणि निष्पक्ष पत्रकारिता सहन होत नाही.त्यामुळेच त्यांच्या गुंडानी नेहा पुरव यांना धमकी दिली आहे. पत्रकरांना धमक्या देऊन पियुष गोयल आपला पराभव टाळू शकत नाहीत असा टोला अतुल लोंढे यांनी लगावला आहे.

शिरूर लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक पोलीस निरीक्षकांची नियुक्ती

पुणे : जिल्ह्यातील ३६-शिरूर लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक पोलीस निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती शिरूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांनी दिली आहे.

निवडणूक पोलीस निरीक्षक म्हणून श्रीमती जया गौरी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथील कक्ष क्रमांक ए-३०६ असा आहे. जया गौरी यांचा संपर्क क्रमांक ९३०९३२७५८७ व ०२०-२९९९७४०० तसेच ई मेलआयडी shirurpoliceobserver@gmail.com असा आहे. निवडणूक पोलीस निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी स्नेहल गुरव यांचा संपर्क क्रमांक ८८०५४४४६०० असा आहे. जया गौरी सकाळी १०.३० ते ११.३० या वेळेत भेटतील, असे शिरूर लोकसभा मतदार संघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून कळविण्यात आले आहे.

महागाई व बेरोजगारीवर महाविकास आघाडीने जनजागृती करावी - राही भिडे

मुंबई : भाजपा सरकारने बेरोजगारी व महागाई याबाबत काहीच पावले उचलली नसल्याने जनता त्रस्त दिसत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महविकास आघाडीने महागाई व बेरोजगारी या मुद्यावर जनजागृती करावी असे मत ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांनी मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित परिसंवादात व्यक्त केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समविचारी लोकांना एकत्र आणून महाविकास आघाडीला मतदान करावे यासाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

शेतक-यांच्या आत्महत्या, वाढती महागाई तसेच बेरोजगारीने जनता त्रस्त असल्याने मोदींची लोकप्रियता घसरली आहे. देशात २०१४ आणि २०१९ मध्ये असलेली मोदी लाट २०२४ मध्ये ओसरली असल्याचे परखड मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नेत्या विद्या चव्हाण यांनी व्यक्त केले.

गेल्या दहा वर्षात मोदींनी लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक केलेली नाही. केवळ आश्वासने दिली. त्यामुळे लोकांमध्ये संतापाची भावना पसरली आहे. संविधान धोक्यात आले आहे. यामुळे समविचारी लोकांना एकत्र करून जनजागृती करण्याचे आवाहन विद्या चव्हाण यांनी केले.

सध्याची राजकीय परिस्थिती पाहता लोकांच्या मनात राग आहे. त्यातच खोके देऊन आमदारांची फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. मोदी शहांनी ईडी सीबीआय सारख्या यंत्रणांचा वापर करून लोकांमध्ये दहशत माजविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यामुळे मोदींच्या दहशतीखाली कोणीही व्यक्त होत नाहीत. मात्र मतदानाच्या माध्यमातून मतदार व्यक्त होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला लोकांचा पाठींबा मिळत असून निवडणुकीचे निकाल महाविकास आघाडीच्या बाजूने लागतील असेही चव्हाण यांनी सांगितले. यावेळी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांनीही आपली मते व्यक्त केली यावेळी बदल घडणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोमुळे वाहतुकीचा सक्षम पर्याय उपलब्ध - मुरलीधर मोहोळ

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : आयटी हब असलेल्या हिंजवडीला शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडणारा शिवाजीनगर ते हिंजवडी हा मेट्रो प्रकल्प अतिशय महत्त्वाकांक्षी असून, त्यामुळे नागरिकांना वेगवान, सक्षम सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय मिळणार असल्याचा विश्वास पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

शिवाजीनगर गावठाण परिसरात आयोजित केलेल्या प्रचार फेरीच्या सांगता सभेत ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, दत्ता खाडे, आदित्य माळवे, रविंद्र साळेगावकर, सुनील पांडे, गणेश बगाडे, किरण ओरसे, डॉ. अजय दुधाने, हेमंत डाबी, अपर्णा कुऱ्हाडे, सचिन वाडेकर, सचिन मानवतकर, दयानंद इरकल, आकाश रेणुसे, संजय तुरेकर यांचा प्रचार फेरीत प्रमुख सहभाग होता.

मोहोळम्हणाले, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणामार्फत पीएमआरडीए सार्वजनिक खासगी भागीदारीतून हा प्रकल्प साकारला जात आहे. या प्रकल्पाची एकूण लांबी २३.३ किलोमीटर असून या मार्गावर स्थानकांची संख्या २३ इतकी आहे. हिंजवडी, वाकड, बालेवाडी, बाणेर, औंफ्लध, गणेशखिंड, खैरेवाडी, शिवाजीनगर आदी भागांना एकमेकांशी जोडणारा हा प्रकल्प आहे. भविष्यात हडपसर व लोणी काळभोरपर्यंत विस्ताराची योजना आहे. सध्या प्रकल्पाचे ५५ टक्के काम पूर्ण झाले असून, मे २०२५ पर्यंत प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणार आहे.

गावठाणातील रोकडोबा मंदिरापासून प्रचार फेरीचा प्रारंभ झाला. परिसरातील गणेश मंडळे आणि सामाजिक संस्थांनी उत्साहात स्वागत केले. ठिकठिकाणी महिलांनी औक्षण केले. शिवाजीनगर गावठाण, राष्ट्रवादी भवन, तोफखाना, जंगली महाराज रस्ता, गोखले स्मारक चौक, फर्ग्युसन कॉलेज रस्तामार्गे ज्ञानेश्वर पादुका चौकात प्रचार फेरीची सांगता झाली.

भीमशक्ती सामाजिक संघटना महाविकास आघाडीच्या पाठीशी - रामदास मधाळे

- सरूडकरांच्या प्रचारार्थ लवकरच कुरुंदवाड येथे मेळावा

कुरुंदवाड/ प्रतिनिधी

भीमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक माजी मंत्री विद्यमान खासदार चंद्रकांत हांडोरे यांच्या आदेशान्वये संपूर्ण राज्यातील भीमशक्ती सामाजिक संघटना महाविकास आघाडी बरोबर असून हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर त्यांच्या प्रचारार्थ लवकरच कुरुंदवाड येथे मेळावा घेऊन सत्यजित पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार करणार असल्याची माहिती रामदास मधाळे यांनी दिली.

खासदार चंद्रकांत हांडोरे यांनी नुकतीच महायुगास आघाडीच्या नेत्यांच्या बरोबर बैठक घेतली असून या बैठकीत महाविकास आघाडी बरोबर राहण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याच धर्तीवर शिरोळ तालुक्यातील भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन आम्ही सत्यजित पाटील यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून लवकरच कुरुंदवाड येथे भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेऊन सत्यजित पाटील यांच्या विजयासाठी ताकदीने कामाला लागणार असल्याची माहिती मधाळे यांनी दिली. यावेळी गौतम ढाले, प्रकाश ढाले, शरद कांबळे, अनिल लोंढे, उत्तम वाघवेकर उपस्थित होते.

सत्यजित पाटील सरूडकरांच्या विजयासाठी प्रयत्न करा : गणपतराव पाटील

शिरोळात प्रचार शुभारंभ

शिरोळ/प्रतिनिधी

विरोधकांनी केलेल्या आरोप प्रत्यारोप आणि टीकेकडे लक्ष देऊ नका प्रत्येक कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीचा जाहीरनामा जनतेपर्यंत पोहोचवून उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांचे मशाल चिन्ह घराघरात सांगून त्यांच्या विजयासाठी प्रयत्नशील रहावे असे आवाहन राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते व श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सहकारमहर्षी गणपतराव पाटील यांनी केले.

शिरोळ येथील ग्रामदैवत श्री बुवाफन महाराज मंदिरात महाविकास आघाडीचे नेतेमंडळी पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार सत्यजित पाटील सरूडकर यांच्या प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना सहकारमहर्षी गणपतराव पाटील यांनी मार्गदर्शन केले यावेळी ते म्हणाले की देशात महाविकास आघाडीची सत्ता येणे गरजेचे आहे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सर्वांनीच सत्यजित पाटील सरूडकर यांच्या विजयासाठी प्रत्येक मतदारांपर्यंत घराघरात जाऊन मशाल चिन्ह पोहोचविण्याचे आवाहन त्यांनी केले.

सत्यजित पाटील सरूडकर यांचा प्रचार शुभारंभ करताना गणपतराव पाटील.

माजी आमदार उल्हास पाटील म्हणाले की महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांचे हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यात पोषक वातावरण आहे जनतेलाही परिवर्तन पाहिजे आहे त्यामुळे आपला विजय निश्चित आहे कार्यकर्त्यांनी प्रचाराचे काटेकोरपणे नियोजन करून शहरातील सर्व घराघरात पोहोचून आपली भूमिका व मशाल चिन्ह सांगून सरूडकरांच्या विजयासाठी परिश्रम घ्यावेत असे आवाहन त्यांनी केले.

कोल्हापूर जिल्हा काँग्रेस किसान सेलचे अध्यक्ष रणजितसिंह पाटील म्हणाले की हुकूमशाही मोडीत काढण्यासाठी केंद्र सरकारला जनतेने हद्दपार करण्याचे ठरवले आहे त्यामुळे या निवडणुकीत सत्यजित पाटील सरुडकरांच्या विजयासाठी सर्व कार्यकर्ते जीवाचे रान करतील शिरोळ तालुक्यातून त्यांना चांगले मताधिक्य मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला

शेतकरी चळवळीचे नेते यशवंत उर्फ बंटी देसाई यांनी मोदी सरकारंवर टीकेची जोड उडवत सर्वसामान्यांच्या हितासाठी महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर येणे गरजेचे आहे त्यामुळे प्रत्येकाने सत्यजित पाटील सरूडकर यांच्या विजयासाठी प्रयत्नशील राहावे असे सांगितले

श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक दरगू गावडे यांनी स्वागत व प्रास्ताविक करून प्रचाराचे नियोजन सांगितले व शिरोळ शहरातील महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उमेदवार सत्यजित पाटील सरूडकर यांच्या विजयासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

दरोगाबा दूध संस्थेचे चेअरमन आप्पासो गावडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी ठाकरे शिवसेना जिल्हाप्रमुख वैभव उगळे , उपजिल्हाप्रमुख मधुकर पाटील श्री दत्त साखर कारखाना संचालक शेखर पाटील युवक काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष अमरसिंह कांबळे , रेणुका भक्त मंडळाचे अध्यक्ष दिलीपराव माने अमरसिंह शिंदे , आनंदराव माने - देशमुख , दत्त ऊस वाहतूक संघटनेचे अध्यक्ष धनाजी पाटील - नरदेकर , अभिजीत माने , राष्ट्रवादी शरद पवार गट जिल्हा उपाध्यक्ष बी.जी माने , तालुकाध्यक्ष विक्रमसिंह जगदाळे , रावसाहेब माने , माजी उपनगराध्यक्ष योगेश पुजारी , तातोबा पाटील , तुकाराम पाटील , फत्तेसिंह मोरे , बजरंग पुजारी , अवधूत उर्फ बाबाजी पाटील जयसिंगपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास गावडे,मानसिंगराव पाटील , शक्तीजीत गुरव , बाळासाहेब कोळी , बापूसाहेब गंगधर लियाकत सनदी बाबासाहेब पाटील नरदेकर परवेज मेस्त्री निलेश गावडे अभिजीत माने आयुब मेस्त्री उदय संकपाळ शिलेदार धोंडीराम दबडे सतीश चव्हाण रामचंद्र पाटील जब्बार मेस्त्री आयजाक भोरे आबा मोरे बाळासाहेब गावडे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर संगमनगर येथे प्रचारफेरी काढण्यात आली

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

पनवेलचा पाणीप्रश्न, शास्तीकर व वाढीव कराची समस्या लवकरच सुटणार - खासदार बारणे

पनवेल/प्रतिनिधी

पनवेल शहराचा पाणी प्रश्न तसेच शास्ती कर व वाढीव कराचा विषय येत्या विधानसभा निवडणुकीपूर्वी निकाली निघालेला असेल, अशी ग्वाही मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी काल (गुरुवारी) दिली.

पनवेल शहरातून भव्य बाईक रॅली काढून खासदार बारणे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर कोळीवाडा येथे झालेल्या जाहीर सभेत बारणे बोलत होते. व्यासपीठावर आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील तसेच अनिल भगत, अरुण भगत, परेश ठाकूर, रुपेश ठोंबरे तसेच महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले की, गेल्या दहा वर्षात पनवेल परिसरात अनेक विकास कामे करता आली याचा आनंद आहे. काही कामे प्रलंबित आहेत, याची मला जाणीव आहे. पण केंद्रात आणि राज्यात आपल्या विचारांचे सरकार आहे. त्यामुळे ते प्रश्नही विधानसभा निवडणुकीपूर्वी सोडवलेले असतील.

■ **एकविरा देवस्थान विकास प्राधिकरण**

पनवेल परिसरात रस्त्यांचे जाळे, रेल्वेची कामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. कोळी समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या कार्ला येथील एकवीरा देवस्थानच्या विकासासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर नमस्कार त्यांनी ६९ कोटींचा निधी मंजूर केला. देवस्थान विकास प्राधिकरणाचा दर्जा देखील देण्यात आला आहे. कार्ला गडाच्या विकासाचा आराखडा बनवण्यात आला असून लवकरच त्या ठिकाणी मोठे वाहनतळ, रोपवेसह विविध सुविधा भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतील, असे बारणे यांनी सांगितले.

आठ पदरी जेएनपीटी रोड, अटल सेतू, मिसिंग लिंक, आदिवासी गावांना रस्ते व वीज, मेट्रो, लोहमार्ग विकास, रेल्वे स्थानकांचा विकास, पासपोर्ट कार्यालय अशा विविध विकास कामांचा आढावा भरणे यांनी यावेळी सादर केला.

■ **'मोदींचा ट्रेलर पाहिलात, आता चित्रपट पाहा'**

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षात केलेले काम म्हणजे केवळ ट्रेलर होता, आता खऱ्या चित्रपटाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे लोकांनी मनात खूणगाठ बांधून ठेवली आहे. जास्तीत-जास्त मतदारांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाणे, एवढेच काम आपल्याला करायचे आहे. प्रत्येक बुथवर किमान २०० मतांची आघाडी मिळवली तरी खासदार बारणे यांना पनवेल मधून विक्रमी मताधिक्य मिळेल. यापुढेही खासदार बारणे हे पनवेल साठी जास्तीत जास्त विकास निधी देतील.

■ **बाईक रॅलीतून युवकांचे शक्ती प्रदर्शन**

पनवेल येथे महामार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला खासदार बारणे व आमदार ठाकूर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून बाईक रॅलीला प्रारंभ झाला. महायुतीच्या विविध पक्षांचे झेंडे, धनुष्यबाण चिन्ह घेऊन शेकडो युवक रॅलीमध्ये सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून खासदार बारणे विजय रथावर आरुढ होऊन कोळीवाडा येथे सभास्थानी दाखल झाले. रॅलीच्या मार्गावर नागरिकांनी दुतर्फा गर्दी केली होती. मतदारांना अभिवादन करत बारणे यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले.

> **'अब की बार, चार सौ पार', 'फिर एक बार, मोदी सरकार', 'आप्पा बारणे तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'होणार होणार, हॅटट्रिक होणार', खिच के ताण, धनुष्यबाण' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.**

■ **नावडे येथे चौकसभा**

पनवेलमध्ये येण्यापूर्वी नावडे फेज टू येथे खासदार बारणे व आमदार ठाकूर यांनी कोपरा सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विधानसभा व लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यामुळे स्त्रीशक्तीला खऱ्या अर्थाने न्याय मिळणार आहे, असे बारणे म्हणाले. सिडको, एमएमआरडीए यांच्याशी संबंधित प्रश्न लवकरच सोडवण्यात येतील, अशी ग्वाही बारणे यांनी दिली.

केंद्रातील मोदी सरकार हे लोकहिताचे काम करणारे सरकार आहे. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने हे सरकार पुन्हा निवडून देण्याची आपल्याला संधी आहे, असे आमदार ठाकूर म्हणाले. खासदार बारणे हे विकासकामांसाठी सातत्याने पाठपुरावा करतात. त्यांच्यामुळेच अनेक प्रकल्प पनवेल परिसरात झाल्याचे ठाकूर यांनी आवर्जून सांगितले.

पुण्याला 'सुखी शहर' बनवूया : रवींद्र धंगेकर

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : गेल्या १० वर्षात पुण्याचे भाजपचे खासदार भाजपचे ६ आमदार व भाजपचे १०० नगरसेवक यांनी पुण्याचे नागरी प्रश्न सोडवत विकास केला असता तर पुण्यातील नागरी समस्या बिकट बनल्या नसत्या. सर्व समाज घटकांना सोबत घेऊन विकास करण्याची ताकद आणि इच्छाशक्ती असणाऱ्या काँग्रेस पक्षाला मतदान करून आपल्या पुण्याला 'सुखी शहर' बनवूया, असे आवाहन महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार आ. रवींद्र धंगेकर यांनी केले. पर्वती विधानसभा मतदार संघातील पदयात्रेच्या सांगते वेळी ते बोलत होते.

या पदयात्रेचे नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. ठिकठिकाणी धंगेकरांचे औक्षण केले जात होते तसेच पदायत्रेत सर्वांना पाणी दिले जात होते. अनेक सर्वाजीनिक मंडळांनी देखील धंगेकरांचे सत्कार केले काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व मित्रपक्षांचे पदाधिकारी व नेते मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभागी होते तीनही पक्षांचे झेंडे डौलाने फडकत होते.

या पदयात्रेचा प्रारंभ मुकुंदनगर येथिल कचेरीचे उमेदवार आ. रवींद्र धंगेकर यांच्या हस्ते उद्घाटन करून झाला. या पदयात्रेत रवींद्र धंगेकर यांच्या समवेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, माजी नगरसेवक अविनाश बागवे, माजी नगरसेविका स्नेहल पाडळे, पर्वती ब्लॉक अध्यक्ष संतोष पाटोळे,मार्केटयार्ड ब्लॉक अध्यक्ष रमेश सोनकांबळे, सतीश पवार, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे सचिन तावरे, नितीन कदम, शशिकांत तापकीर, बाळासाहेब अटळ, महिला अध्यक्षा वाणीताई, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शिक्षण मंडळाचे सदस्य राजेंद्र शिळीमकर, विभाग अध्यक्ष सुरज लोखंडे, संपर्क प्रमुख बाळासाहेब ओसवाल, युवा प्रमुख अमोल रासकर, वृक्ष संवर्धन समितीचे सदस्य द. स. पोळेकर, मागासवर्गीय माजी अध्यक्ष शीला रतनगिरी, आबनावे, आशुतोष शिंदे, भरत सुराणा, चंदू माने, अनुसया गायकवाड, शर्वरी गोतरणे, तसेच काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या जीप / पदयात्रेची सुरुवात मुंकूद नगर येथील निवडणुक कचेरीचे उद्घाटन करून - डायस प्लॉट - औद्योगिक वसाहत - महर्षीनगर - आदिनाथ सोसायटी - सातारा रोड - मार्केट यार्ड - आगरवाल डेअरी - सॅलसबरी पार्क - हाईट पार्क सोसायटी - गंगाधाम चौक येथे ही जीप/ पदयात्रा समाप्त झाली.

कामगारांना रस्त्यावर आणण्याचे काम भाजप सरकारने केले

कामगार संघटना संयुक्त कृती समितीचा आरोप

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : मोदी सरकारने केवळ बड्या कॉर्पोरेट कंपन्यांना खुश करण्यासाठी कामगारांची अधिकाधिक कोंडी करण्याचे धोरण अवलंबले आहे. मोदी सरकारने कामगार कायद्यात तस अन्यायकारक बदल करून गेल्या ७५ वर्षांत कामगारांसाठी असलेले संरक्षणाचे कायदे काढून कामगारांना रस्त्यावर आणण्याचे काम केले आहे. मोदी - शहांनी कामगारांना गुलामगिरीत लोटले आहे, असा आरोप शहरातील कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

असंघटित कामगारांबाबत पोकळ प्रचारी आणि बोगस घोषणाबाजी करण्यापलिकडे या सरकारने काहीही केलेले नाही. त्यामुळे आम्हीसर्व कामगार संघटनांनी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या पाठीमागे उभे राहण्याचा व त्यांचा प्रचार करण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

पुणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ 'देशातील सत्ताधारी पक्षाचे कामगार विरोधी धोरण' या विषयावर पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या पत्रकार परिषदेस संयुक्त कामगार संघटना कृती समितीचे निमंत्रक कॉ. अजीत अभ्यंकर, जिल्हा घरकामगार संघटनेच्या अध्यक्षा किरण मोघे, शिवसेना कामगार संघटनेचे रघुनाथ कुचिक, कृती समितीचे अध्यक्ष व महाराष्ट्र इंटक संघटनेचे अध्यक्ष कैलास कदम, कामगार नेते सुनिल शिंदे, यांची पत्रकार परिषद आयोजित केली होती.

भाजप महायुतीच्या विरोधात महाविकास आघाडीचा प्रचार घरोघरी जावून करण्याचा निर्णय घेतला आहे.

सुनिल शिंदे म्हणाले, जे कामगार कायदे आहेत, ते काँग्रेसच्या काळातील आहेत. मात्र आजवर असंघटित कामगारांसाठी एकही कायदा नाही. किमान वेतन कायदा असंघटीत कामगारांना लागू होत नाही. या विरोधात कुठे दादही मागता येत नाही. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात असंघटीत कामगारांचा कायदा करण्याची ग्वाही दिली आहे.

कैलास कदम म्हणाले, देशातील मोदी शहा सरकारने कामगारांच्या हक्कांवर घाला घातला. देशातील कामगार रस्त्यावर आणण्याचे काम मोदी शहांनी केले. कामगारांच्या ४४ कामगार कायद्यांएवजी चार श्रमसंहिता आणण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे देशातील विविध कामगार संघटनांनी इंडिया आघाडी व महाविकास आघाडीच्या उमेदवारांना पाठींबा देण्याचा निर्णय घेतला आहे. आघाडीचे उमेदवार निवडून गेल्यानंतर कामगारांवर लादलेले अन्यायकारक कायदे रद्द करण्यासाठी प्रयत्न करण्याची मागणी आम्ही केली आहे. यावेळी प्रचारप्रमुख मोहन जोशी, पक्ष सरचिटणीस अजित दरेकर, राज अंबिके आदी उपस्थित होते राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी प्रास्ताविक केले.

धोम - बलकवडीचे आवर्तन सुटले...

पिण्याचे पाणी तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मिटणार

भोर /प्रतिनिधी

भोर तालुक्याच्या दक्षिणेकडील वीसगाव, चाळीसगाव खोऱ्यात पाण्याचे जलस्त्रोत आटल्याने विहिरीं,ओढे -नाल्यांची तळ गाठला होता. दरम्यान परिसरातील अनेक गावांना पाणीटंचाई तीव्र जाणवू लागली होती.तर जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर झाला होता.यामुळे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार धोम- बलकवडी धरणाच्या उजव्या कालव्याला दुसरे आवर्तन १५० क्यूसेक्सने लसंपदा विभागाने सोडले आहे.

तालुक्याचा दक्षिण पट्टा पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतो.मात्र दक्षिण पट्ट्यातील बहुतांशी भाग हा खडकाळ व उताराचा असल्याने पावसाचे पाणी काही दिवसातच वाहून जाते.त्यामुळे दरवर्षी वीसगाव खोऱ्यातील दहा ते पंधरा तर चाळीसगाव खोऱ्यातील बहुतांशी गावांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागतात.यंदा पावसाचे प्रमाणही कमी झाले होते.त्यामुळे ओढे - नाले, विहिरींना पाणी कमी होते. त्यातच यंदा कडक उन्हाळा पडल्याने एप्रिलच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागत होते.पाणीटंचाईमुळे जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याने जनावरे जगवायची कशी असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला होता. दरम्यान धोम -बलकवडी धरणाचे दुसरे आवर्तन सुटल्याने वीसगाव ,चाळीसगाव खोऱ्यातील पिण्याच्या पाण्याची तसेच जनावरांच्या चारा -पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. तर आवर्तनामुळे शेतकरी वर्गात आनंद व्यक्त केला जात आहे.

श्रीमंत शाहू महाराज छत्रपती ५ लाख मतांनी निवडून येतील : सतेज पाटील

कोल्हापूर : देशात कुठंही ही गेलात तरी कोल्हापूर बरोबर शाहू महाराजांचे नाव आदरानं घेतलं जातं. ते पुसण्याचं काम खा. संजय मंडलिक करत आहेत. मागच्या निवडणूकीत कोणाला तरी पाडण्यासाठी आम्ही मदत केल्याचं कृतघ्न मंडलिक सांगत आहेत. त्यावेळी मी व्यासपीठावर न येता खाली बसून करेक्ट कार्यक्रम केला होता. आता मी व्यासपीठावर आहे. त्यामुळे मंडलिकांचे ३ लाखाचे लीड जावून श्रीमंत शाहू महाराज छत्रपती हे ५ लाख मतांनी निवडून येतील. एवढी मदत करणा-या माझ्यासारख्याला मंडलिक जाहीर सभांतून बोलत आहेत. २०१९ च्या निवडणूकीत मदतीसाठी शाहू महाराजांच्या पाया पडणा-या मंडलिकांच्या इतका कृतघ्न माणूस मी आयुष्यात बघितला नाही. अशा कृतघ्न मंडलिकांचा करेक्ट कार्यक्रम करा असं आवाहन आमदार सतेज पाटील यांनी केले.

कागल तालुक्यातील कापशी इथं महाविकासआघाडीचे उमेदवार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच श्रद्धा कोळी उपस्थित होत्या.

आ. सतेज पाटील म्हणाले, संजय घाटगेंमुळे कागल तालुक्यातून परिवर्तनाची लाट आहे. खरंतर मागील पाच वर्षात आम्ही केलेल्या चुकीचे प्रायश्चित ते भोगत आहोत. आम्ही लागण करून चुक केली. आता खोडवं काढून टाकायची वेळ आलीय. शिव शाहूंच्या विचारांची लागण करण्याची हिच वेळ आहे. या राहिलेल्या १५ दिवसांत अनेक अफवा पसरवल्या जातील. त्यांच्यावर विश्वास ठेवू नका.

माजी आमदार संजय घाटगे म्हणाले, श्रीमंत शाहू महाराज छत्रपती हे नुसते गादीचे वारसदार नसून राजर्षी शाहूंच्या विचारांचे वारसदार आहेत. एक चारित्र संपन्न, समाजाभिमुख उमेदवार एका बाजूला उभा असताना कागल तालुक्यातून आपल्यालाच दिड लाखाचे लिड मिळेल अशी दिवा स्वप्न काहीजण बघत आहेत. परंतू निकाल आल्यावर शाहू महाराजांचे कागल मधील लिड पाहून त्यांचे डोळे पांढरे झाल्याशिवाय राहणार नाही. देशात अबकी बार ४०० पारचा नारा देवून भारत महासत्ता बनवतो, म्हणून काहीजण छाती बडवून घेत आहेत. परंतू ५६ टक्के लोक २८ वर्षे वयाचे असल्याने येत्या दोन वर्षात भारत महासत्ता बनणारच आहे.

मोठ मोठी धरण, बंधारे, सेवा संस्था,जिल्हा बँका, दुध संघ, विहीरी, घरे हे सगळं काँग्रेस नं तळागाळापर्यंत पोहचविलंया. आणि आता आयत्या पीठावर रांगोळ्या ओढून यांनी जीएसटी नं माणसं डबघाईला आणलीत. समाज उद्धवस्त होत आहे. त्यामुळं 'अब की बार मोदी हद्दपार' हाच नारा योग्य असल्याचं त्यांनी सांगितले आहे.

याप्रसंगी शिवानंद माळी, दत्तोपंत वालावलकर, दत्ताजीराव घाटगे, सागर कोंडेकर, एकनाथ नार्वेकर,धनाजी सेनापतीकर, शिवानी मोहन मोरे,शिवाजी कांबळे, उदय पवार यांनी मनोगतं व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी उदयबाबा घोरपडे, मालोजी राणोजी घोरपडे, धनराज घाटगे,बिद्री संचालक रणजित मुडुकशिवाले, संभाजी भोकरे, महेश देशपांडे, चंदाराणी पाटील, अबोली कांबळे, रवी कांबळे, चंद्रकांत माळी, सागर कोंडेकर, तानाजी पाटील, डी बी कांबळे आदी मान्यवरांसह कापशी परिसरातील तमाम कार्यकर्ते उपस्थित होते.

आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त दि. २९ एप्रिल रोजी 'अनुवेध'

पुणे : 'मनीषा नृत्यालय'च्या वतीने आंतरराष्ट्रीय नृत्यदिनानिमित्त दि.२९ एप्रिल रोजी 'अनुवेध ' या कथक नृत्य सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे.ज्येष्ठ नृत्यगुरू मनीषा साठे यांच्या शिष्या आपापल्या विद्यार्थीनींसमवेत नृत्य सादर करणार आहेत.

हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह (कोथरूड) येथे सायंकाळी ६ वाजता होणार आहे.ज्येष्ठ लेखक आणि कला समीक्षक आशीष मोहन खोकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शांभवी दांडेकर, शिल्पा दातार, मंजिरी कारुळकर, पद्मश्री जोशी, पूर्वा शाह, मानसी गदो, तेजस्विनी साठे, माधुरी आपटे, गौरी स्वकुळ, ईशा काथवटे, अदिती कुलकर्णी, पायल गोखले, वल्लरी आपटे, मिथिला भिडे, मधुरा आफळे या कार्यक्रमात नृत्य सादर करणार आहेत.

भाजपचे डावपेच; पण 'किसमे कितना हैं दम'!

प्रवीण पगारे

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीची गणितं दिवसागणिक बदलत आहेत. महायुती असो अथवा महाविकास आघाडी दोघांनाही यंदा स्वतःची ताकद किती आहे हे दाखवून द्यावे लागणार आहे.त्यामुळेच महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणुका घेतल्या जात आहेत. भाजपने हे ठरवून केले आहे मात्र त्यामागे शिवसेना आणि राष्ट्रवादी या दोन प्रादेशिक पक्षांच्या विभाजनानंतर निर्माण झालेल्या चार गटांची नेमकी ताकद किती हेच भाजपला पाहायचे आहे तर आम्ही पूर्वी इतकेच सक्षम आहोत,हेच या चारही गटांना आता सिद्ध करावे लागणार आहे. थोडक्यात काय तर 'किसमे कितना हैं दम' हेच या निवडणुकांमधून अधोरेखित होणार असल्याचे राजकीय अभ्यासकांचे ठाम मत आहे.

जागा वाटपाचा फॉर्म्युला महायुती काय महाविकास आघाडीत महत्वाचा ठरला. अगदी जाहीर सभेतून उमेदवार घोषित करण्यामागे एकप्रकारे दबावतंत्र वापरून जास्तीच्या जागा पदरात पाडून घेण्यासाठी ही युक्ती लढवली गेली. लोकसभेच्या प्रत्येक निवडणुकीवेळी हे चित्र पाहावयास मिळते. त्यात बंडाचे निशाण फडकवण्याची भाषा करणारे नंतर थंड होतात. कारण तसे पाहिले तर लोकसभा निवडणुकीत बंड करणाऱ्या एका व्यक्तीमुळे तुसभरही काही फरक पडत नाही. त्यामुळे काल परवापर्यंत ज्यांनी बंडाचे भाषा केली त्यांनी आज भूमिका बदलली आहे. हे विजय शिवतारे असो किंवा हर्षवर्धन पाटील अशी अनेक उदाहरणे आहेत. ज्यातून हे स्पष्ट झाले असले तरी सांगलीत मात्र वेगळे चित्र दिसणार आहे.

आता महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणुका घेण्यामागे कोणता उद्देश हा प्रश्न पाहिला तर सत्ताधारी भाजपला बेरजेचे राजकारण करण्यास वेळ मिळावा आणि सभेसाठी मातब्बर नेत्यांना आणता यावे यादृष्टीने हे नियोजन झाले आहे असे राजकीय अभ्यासकांचे म्हणणे आहे.मात्र यंदा कोणाची किती ताकद आहे, हे प्रथमच सर्वांसमोर येणार आहे. याकडेही राजकीय अभ्यासक लक्ष वेधत आहेत.

महाराष्ट्रात प्रबळ असलेले शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन पक्ष; पण त्यांच्यात फूट पाडण्याचे राजकारण भाजपने यशस्वी करून दाखवले आहे. परिणामी दोन गटात विभागलेल्या या दोन पक्षांच्या चार गटांना आता पहिल्यादांच त्यांची स्वतःची ताकद किती आहे. हे दाखवून द्यावे लागणार आहे. एकप्रकारे वर्चस्व मिळविण्याचा उद्देश जरी असला तरी अस्तित्व राखण्याचे कडवे आव्हान भाजपने त्यांच्यासमोर अप्रत्यक्ष दिले आहे.असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. वास्तविक देशात भाजपला पर्याय हा काँग्रेस पक्ष आहे.हे सर्वश्रुत आहे.त्यामुळे शिवसेना किंवा राष्ट्रवादी हे काही पर्याय ठरू शकत नाही आणि ठरणारही नाहीत.कारण मुळात हे दोन पक्ष प्रादेशिक पातळीवर ताकदवान आहेत मात्र आजवर त्यांची स्वतः ची ताकद किती हे कधी दिसले नाही किंवा ती दाखविण्याची वेळही आली नाही. पण काँग्रेस मुक्त भारत हा अजेंडा राबविणाऱ्या भाजपने ३८ प्रादेशिक पक्षांच्या कुबड्यांवर देशाची सत्ता हस्तगत केली मात्र काँग्रेस मुक्त भारत हे काही झाले नाही.कारण काँग्रेस हा पक्ष राष्ट्रीय आहे.त्यामुळे काँग्रेस मुक्त भारत नारा देताना भाजपने काँग्रेसचे खच्चीकरण केले असले अथवा कमकुवत केले तरीही या पक्षाची व्होट बँक म्हणजेच मतांचे प्रमाण जास्त काही खालावले नाही.फरक इतकाच काँग्रेसमधील दिग्गजांना गळाला लावून भाजपने काँग्रेसला नेस्तनाबूत केले आहे.२०१४ ला सत्ता हस्तगत केल्यानंतर भाजपने प्रादेशिक पक्ष मुक्त राज्ये हाच छुपा अजेंडा राबविला आणि महाराष्ट्रात त्यानुसार आज जे चित्र दिसत आहे तो याचाच भाग आहे.असे राजकीय निरीक्षकांचे निरीक्षण आहे.त्यामुळे प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पाडायचे अथवा त्यांच्यातील मातब्बरांना भाजपमध्ये सामावून घ्यायचे आणि निवडणुकांमध्ये एकमेकांसमोर उभे करायचे. त्यातून होणाऱ्या मत विभागणीचा अचूकतेने फायदा उचलायचा आणि स्वतः बलाढ्य असल्याचे दाखवून द्यायचे हीच रणनीती भाजपची आहे.त्यामुळेच देशात सात टप्प्यात आणि महाराष्ट्रात पाच टप्प्यात निवडणुका होत आहेत.प्रतिस्पर्धी पक्षांना गारद करायचे शिवाय बरोबर असलेल्या सहकारी मित्र पक्षांना त्यांची जागा दाखवून द्यायची आणि निर्विवाद वर्चस्व मिळवायचे हेच यंदाच्या महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीतून दिसेल का? भाजपचे मनसुबे सफल होतील का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. त्यामुळे दोन्ही शिवसेना आणि दोन्ही राष्ट्रवादीला यंदा ताकद दाखवताना अस्तित्वही राखावे लागणार आहे.त्यामुळे 'किस में कितना हैं दम' या परीक्षेला दोन्ही शिवसेना व राष्ट्रवादीला सामोरे जावे लागणार आहे.असा ठाम निष्कर्ष राजकीय अभ्यासकांचा आहे.

पाटण तालुक्यात निवडणुकीसाठी मतदारांमध्ये निरुत्साह; प्रश्न 'जैसे थे'!

पाटण / प्रतिनिधी

सर्वत्र लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आसताना पाटण तालुक्यात या निवडणुकीसंदर्भात मतदारांमध्ये निरुत्साह दिसत आहे. केवळ राजकीय नेते, पुढारी, कार्यकर्ते यांचीच गर्दी सभांना दिसत असताना मतदारांनी मात्र या सभांकडे पाठ फिरवली आहे. सातारा लोकसभा मतदार संघासाठी एकूण १६ उमेदवार रिंगणात असताना खरी चुरस भाजपाचे उमेदवार श्रीमंत उदयनराजे भोसले व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यामध्ये होताना दिसत आहे. मात्र, पाटण तालुक्यात आतापर्यंत झालेल्या खासदारांनी खासदार फंडाव्यतिरीक्त रोजगार निर्मिती, विकासात्मक प्रकल्प राबवले नाहीत, यामुळे खासदारांच्या बाजूने पाटण तालुका मागासलेपणात असल्याची भावना मतदारांची झाली असून सध्या चालू असलेल्या लोकसभा निवडणुकीसाठी मतदारांमध्ये निरुत्साह दिसत आहे.

■ चार- चार पिढ्या झाल्या तरी धरणग्रस्तांचे प्रश्न धूळखात

पाटण तालुका भौगोलिकदृष्ट्या डोंगर दऱ्याखोऱ्यांचा आहे. या तालुक्याने महाराष्ट्राला विज आणि पाणी मुबलक दिले. अजूनही कोयना धरण, विज प्रकल्पासह, तारळी, गुरेघर, मांड, मराठवाडी, निवकणे, चिटेघर, बिबी या धरणांची कामे अपुरी आहेत. धरणग्रस्त, विस्थापितांचे प्रश्न सुटलेले नाहीत. तसा प्रयत्न आतापर्यंत कोणत्याही खासदारांनी केला नाही. या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न राज्य शासन व केंद्राकडे धुळ खात पडलेले आहेत. कोयना धरणग्रस्तांच्या चार चार पिढ्या झाल्या तरी आजही त्यांना आंदोलन, उपोषणाला बसावे लागत आहे. ही वस्तुस्थिती आहे.

■ रोजगार निर्मितीच्या केवळ वल्गनाच..

पाटण तालुक्यात स्थानिक पातळीवर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार निर्मिती करून देण्याच्या आतापर्यंत केवळ वल्गनाच झाल्या. दोन दशकापूर्वी पाटण तालुक्यात माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी पवनउर्जा प्रकल्प साकारून स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिली. हा पवनउर्जा प्रकल्प पाटण तालुक्यासह सातारा, जावली तालुक्यात देखील साकारला गेला. या माध्यमातून हाजारो लोकांना रोजगार, नोकरी उपलब्ध झाली. नवीन महाबळेश्वर प्रकल्पाच्या माध्यमातून पर्यटन क्रांती करण्याचा प्रयत्न देखील विक्रमसिंह पाटणकर यांनी केला. मात्र स्थानिक विरोधी नेत्यांनी यात विकासात्मक दृष्टी न ठेवता या प्रकल्पाला विरोध केला. आज याच विरोधी नेत्यांच्याकडे सत्ता आसताना नवीन रोजगार निर्मितीचा एखादा प्रकल्प न आणता सुशिक्षित बेरोजगारांचे मेळावे घेऊन त्यांना ठेकेदारी पध्दतीवर पुणे- मुंबई सारख्या शहरात नोकरीसाठी धाडले जात आहे. यामुळे पाटण तालुक्यातून तरुणांचे लोंढे शहराकडे धाव घेऊ लागले आहेत. यामुळे दिवसेंदिवस तालुक्यातून तरुणांची संख्या कमी होताना दिसत आहे. याचे गांभीर्य आज तरी कोणाला दिसत नाही.

■ सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाने रोजगार निर्मितीपेक्षा रोजगार उद्ध्वस्तेकडे वाटचाल..

२००४ ते २००९ या दरम्यान खा. श्रीनिवास पाटील यांनी केंद्र शासनाकडून सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पश्चिम घाट नजरेसमोर ठेवून सह्याद्री व्याघ्र प्रकल्प प्रस्तावित केला. या व्याघ्र प्रकल्पात सर्वात जास्त गावे पाटण तालुक्यातील बाधित झाली. प्रकल्पाच्या कोअर, बफर झोनच्या नियमावलीत या गावांच्या सार्वत्रिक विकासावर खिळ बसली. जंगली जणावरांचा उपद्रयाप वाढला. हा उपद्रयाप बघता बघता गाव शहरापर्यंत पोहचला. बिबट्या, डुक्कर, गवा रेडे सारखी हिंस्र प्राणी लोकांच्या घरात घुसू लागल्याचे चित्र आपल्याला पहायला मिळत आहे. जंगली जणावरांच्या संरक्षणासाठी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती केली खरी. मात्र यात माणसांच्या संरक्षणाचा, त्यांच्या शेतीच्या संरक्षणाचा विचार झाला नाही. याचा परिणाम या जंगली प्राण्यांचा शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांवर हल्ले, शेतकऱ्यांवर हल्ले, शेतीची नासधूस शेती उध्वस्त होऊ लागली. प्राण्यांच्या भितीमुळे तालुक्यातील शेकडो गावात शेतकऱ्यांनी शेती करायची सोडून देऊन उपजीविकासाठी कुटुंबासह शहराची वाट धरली. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती तर नाहीच, विकासात्मक बाबी नाहीच.. तर तालुका निम्मा उध्वस्त झाला. याचा परिणाम खा.श्रीनिवास पाटील यांना या लोकसभा निवडणूकीच्या उमेदवारीसाठी सर्व बाजूंनी विरोध झाला.

■ आश्वासने देण्यापेक्षा काम दाखवा, मगच मते मागायला या.. : मतदारांचे उमेदवारांना आवाहन

यानंतर सातारा लोकसभा मतदार संघात पाटण विधानसभा मतदार संघ विलीनीकरण झाल्यानंतर श्रीमंत खा. उदयनराजे भोसले यांनी लोकसभेतून पाटण तालुक्याचे नेतृत्व केले. या काळात तालुक्यातील मतदारांना विकासात्मक कामाच्या, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार निर्मिती प्रकल्पाच्या व प्रकल्पग्रस्तांना त्यांचे प्रश्न मार्गी लागतील याच्या अनेक अपेक्षा होत्या. सर्वांचा अपेक्षा भंग झाल्या असल्याची भावना सद्या मतदारांच्यात आहे. यामुळे पाटण तालुक्यातील सामान्य मतदारांच्यात श्रीमंत खा.उदयनराजे भोसले यांच्या उमेदवारी विषयी ऐवढी उत्सुकता दिसत नसल्याची भावना लोकांची आहे.

सध्या सुरू असलेल्या सातारा लोकसभा निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून आ. शशिकांत शिंदे हे रिगंणात उतरले आहेत. पाटण तालुक्यातील मतदारांसाठी शशिकांत शिंदे हे नवखेच उमेदवार आहेत. जे जुन्या खासदारांनी केले तेच नवीन करणार यात काही नवल नाही. पूर्वीच्या जावली विधानसभा मतदार संघाचे नेतृत्व शशिकांत शिंदे यांनी केले. जावली तालुक्यात देखील कोयना धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त आहेत. पाटण तालुक्याचे प्रश्न आहेत. तेच जावली तालुक्याचे आहेत. अजूनही तेथील प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न कोयना धरण ग्रस्तांसारखे पडून आहेत. यामुळे पाटण तालुक्यातील मतदारांच्यात या निवडणुकीत निरउत्साह दिसत आहे. उमेदवारांच्या कोपरा सभांना मतदारांचा म्हणावा तसा प्रतिसाद दिसत नाही. नुसती आश्वासने देण्यापेक्षा आता तुमचे काम दाखवा मगच मते मागायला या.., असे मतदार उमेदवारांना सांगू लागले आहेत.

महिमानगड येथे दुर्गप्रेमींकडून श्री हनुमान जन्मोत्सव साजरा

वडूज : संपूर्ण देशात चैत्र पौर्णिमेला श्रीरामभक्त पवनपुत्र हनुमंताचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी दिनांक २३ एप्रिल रोजी गावोगावी मोठ्या थाटात श्री हनुमान जन्मोत्सव संपन्न झाला. हा जन्मोत्सव महिमानगड येथे एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने भक्तांनी साजरा केला.

छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातील प्रत्येक गडकोटांवर गदाधारी हनुमंताची मूर्ती असलेली मंदिर-राऊळे बघायला आज देखील मिळतात. असेच एक प्राचीन मंदिर शिवरायांच्या स्वराज्याची साक्ष देणाऱ्या माण तालुक्यातील महिमानगडावर देखील आहे. माहिमानगडच्या पंचक्रोशीत ह्या मंदिराची ख्याती आहे. परंतु सद्य:स्थितीत हे मंदिर पूर्णपणे पडलेल्या अवस्थेत असून मंदिरातील हनुमानाची मूर्ती ऊन वारा पावसामध्ये उघडी पडलेली आहे. अशा वेळी लोकसहभागातुन या मंदिराचा जीर्णोद्धार होणं अपेक्षित आहे.

संवर्धनासाठी झटणाऱ्या टीम भुषणगड व शिवसह्यगिरी फौंडेशनच्या दुर्गसेवक,शिवप्रेमींना ही गोष्ट स्वस्थ बसू देत नव्हती. अशा परिस्थितीत सर्व दुर्गसेवक, शिवप्रेमींनी एकत्रित येऊन ह्या प्राचीन श्री हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार केला पाहिजे, ह्यासाठी पाऊले उचलण्यास सुरुवात केली. मंदिराचे जुने सुस्थितीत असलेले रूप कसे असेल ह्याचा इतिहास अभ्यासकाच्या मदतीने शोध घेतला. त्यारूपास तंतोतंत जुळणारा मंदिराचा आराखडा तयार करण्यात आला. मारुतीरायाच्या साक्षीने मंदिर जीर्णोद्धाराचा संकल्प देखील घेण्यात आला आहे. तरी सर्व समाजघटकांनी ह्या मध्ये खारीचा वाटा उचलून हे कार्य पुर्णत्वास न्हेणे गरजेचे आहे. ह्या चैत्र पौर्णिमेला म्हणजेच हनुमान जन्मोत्सवास दुर्गसंवर्धन करणाऱ्या दुर्गसेवकांनी, शिवप्रेमींनी तसेच ग्रामस्थांनी एकत्रित येऊन मारुतीरायाची विधिवत पूजा केली.

ह्यावेळी मोहन तोडकर, भाऊ चव्हाण, अनिकेत पवार, ओंकार गाढवे, अजिंक्य गडकरी, कल्पीत गडकरी, साईराज माने, उपस्थित होते. मंदीराचे कामं पुर्णत्वास न्हेण्याचा निर्धार करून हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्याला तीन वर्षांची कैद

सातारा : 'माझ्या बायकोशी दारू पिऊन का बोलतोस,' असे म्हणाल्याच्या कारणावरून विजय हरी भोसले (रा. देगाव, ता. सातारा) यांच्या पोटात चाकू भोसकून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. याप्रकरणी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश (३ रे) एन. एच. जाधव यांनी एका कापड दुकानदाराला तीन वर्ष साधी कैद तसेच २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. लक्ष्मण धनंजय पाटील (वय ३८, रा. कारंडवाडी, ता. सातारा) असे शिक्षा सुनावलेल्या आरोपीचे नाव आहे.

या खटल्याची माहिती अशी की, कारंडवाडी, ता. सातारा येथे ११ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी साडेपाच वाजता विजय भोसले यांनी आरोपी लक्ष्मण पाटील याला जाब विचारला. 'तू दारू पिऊन माझ्या बायकोशी का बोलतोस' असे म्हणताच लक्ष्मण पाटील याने त्याच्या जवळील चाकूने विजय भोसले यांच्या पोटात चाकूने भोसकले. यात भोसले जखमी झाले. सातारा तालुका पोलीस ठाण्यात लक्ष्मण पाटील याच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाला होता. तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक ए. एस. चौधरी यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीत ९ साक्षीदार तपासले. पुरावे आणि सरकार पक्षाचे युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी लक्ष्मण पाटील याला तीन महिने साधी कैद व २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

शाश्वत विकासासाठी बौद्धिक संपदा पूरक : प्रा. गणेश हिंगमिरे

राजदंड न्यूज नेटवर्क

पुणे : पेटंटसारख्या बौद्धिक संपदा या संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी अत्यंत पूरक आहेत, त्याचा फायदा जगभरातील देशांनी घ्यावा, असे मत पेटंटविषयक तज्ज्ञ प्रा. गणेश हिंगमिरे यांनी व्यक्त केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या डीईएस पुणे विद्यापीठाच्या वतीने बौद्धिक संपदा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात हिंगमिरे बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रसाद खांडेकर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन कुलकर्णी, बीएमसीसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश कुचेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

हिंगमिरे म्हणाले, 'माणसांसाठी आणि जगासाठी शांतता प्रस्थापित करणे आणि समृद्धी निर्माण करणे हे संयुक्त राष्ट्रसंघाचे शाश्वत विकास उद्दिष्ट आहे. त्यासाठी पेटंटबरोबरच भौगोलिक चिन्हांकन जीआय ही बौद्धिक संपदा महत्त्वाची आहे. जीआयमुळे पारंपरिक पद्धतीने तयार केल्या जाणाऱ्या शेतीजन्य पदार्थांना किंवा निसर्गाच्या सानिध्यात राहणाऱ्या आदिवासी मंडळींकडून तयार केल्या जाणाऱ्या वस्तूंना जीआय मानांकन मिळते.'

हिंगमिरे पुढे म्हणाले, 'युरोपात साठ हजार जीआय नोंदी झाल्या आहेत. चीनमध्ये जवळपास अकरा हजार नोंदी आढळतात. भारतात ही संख्या सातशेच्या आसपास आहे. जीआय हा पूर्णपणे पर्यावरणपूरक आणि समूहाचा बौद्धिक संपदा अधिकार असल्याने त्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसह संयुक्त राष्ट्रांचे शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये साध्य होऊ शकतात. त्यासाठी शालेय स्तरापासून पेटंटसारखे विषय शिकवावेत आणि विद्यापीठात बौद्धिक संपदेच्या नोंदी करण्यास प्रोत्साहन द्यावे.'

शहापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षिका

सौ. सुजाता जाधव यांची 'मॉडेल शिक्षिका' म्हणून निवड

सातारा : जि.प. शिक्षण विभाग व प्रशिक्षण संस्था फलटण, पायजाम फाउंडेशन व उज्जीवन स्मॉल बँक फायनान्स यांच्या संयुक्त विद्यमाने मुलभूत संगणक व कोडिंग प्रशिक्षण आयोजित केले होते. त्यामध्ये सौ. सुजाता जाधव मॉडेल शिक्षिका म्हणून गौरविण्यात आले.

सौ. जाधव यांनी उत्कृष्टपणे प्रशिक्षण पूर्ण करून टॉप ४२ शिक्षकांमध्ये आपले स्थान पटकावले. या प्रशिक्षणासाठी प्रारंभी ५१० शिक्षकाने नोंदणी केली होती. त्यापैकी १४४ शिक्षकांना प्रमाणपत्र देण्यात आली.तर मॉडेल शिक्षक म्हणून टॉप ४२ शिक्षकांची नावे घोषित करण्यात आली. यामध्ये सौ. जाधव यांचा समावेश आहे.

पारितोषिक वितरण सोहळा नुकताच येथील जिजामाता अध्यापक विद्यालय येथे पार पडला. या उत्कृष्ट कामगिरीबद्धल जि. प. प्राथमिक शाळा शहापूर, ता.सातारा या शाळेत आठ संगणक असणारी लॅब प्राप्त झाली आहे. शाळेचा प्रत्येक विद्यार्थ्यी संगणक ज्ञानात पारंगत असावा. शिवाय, शाळेची गुणवत्ता विकास व्हावा. यासाठी सौ. जाधव यांनी प्रयत्न केले.

अपघातात जखमी केल्याप्रकरणी दुचाकी चालकावर गुन्हा

सातारा : हिरापूर, ता. सातारा गावच्या हद्दीत बसथांब्याजवळ बुलेटची (एमएच ११ डीजी ८३६०) पादचाऱ्याला धडक बसल्याने झालेल्या अपघातात कृष्णा बाबुराव पवार (वय ५०, रा. हिरापूर) हे जखमी झाले. ही घटना १९ एप्रिल रोजी घडली. याप्रकरणी प्रज्वल जगन्नाथ शेलार (वय २४, रा. गवडी, ता. सातारा) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

दारू विक्री; एकावर कारवाई

सातारा : बेकायदा दारु विक्रीप्रकरणी एकावर शाहूपुरी पोलिसांनी कारवाई केली आहे. येथील जुना मोटर स्टँड येथे गणेश शिवाजी जाधव (वय ५५, रा. आकाशवाणी झोपडपट्टी, सातारा) हा दि. २२ एप्रिल रोजी रात्री बेकायदा दारु विक्री करताना पोलिसांना आढळून आला. त्यानुसार पोलिसांनी त्याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

'मी अवश्य मतदान करणार'; सापमध्ये दिव्यांग बांधवांचा निर्धार!

कोरेगाव : 'मी मतदान करणार आणि इतरांनाही मतदान करण्यास प्रवृत्त करणार', असा निर्धार कोरेगाव विधानसभा मतदारसंघ अंतर्गत साप येथे दिव्यांग बांधवांनी व्यक्त केला.

मतदान जनजागृती पथकातर्फे सातारा लोकसभा मतदारसंघ अंतर्गत कोरेगाव विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान जागृतीसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. स्पर्धा, व्याख्याने, मेळावे इत्यादी माध्यमातून मतदानाचे आणि लोकशाहीचे महत्त्व नागरिकांच्या मनावर ठसविण्यात येत आहे. त्या अंतर्गत हा उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमाला साप मधील दिव्यांग बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि जागृती करणारे अधिकाऱ्यांबरोबर मुक्तपणे संवाद देखील साधला.

यावेळी मतदान जनजागृती पथकाचे प्रमुख यशेंद्र क्षीरसागर, सदस्य मंगेश घाडगे, ग्रामसेवक किरण कंठे तसेच राहुल कदम आणि ग्रामस्थ मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. यावेळी मतदानाची शपथ घेण्यात आली.

क्षीरसागर यावेळी म्हणाले, शंभर टक्के मतदान होणे गरजेचे आहे. लोकशाही बळकट होण्यासाठी लोकशाही प्रक्रियेमध्ये समाजातील सर्व घटकांनी सहभाग घेणे आवश्यक आहे. देशात विकास हवा, देशामध्ये समृद्धी नांदावी, तसेच संस्कृतीचे संवर्धन व्हावे अशा सर्व गोष्टींसाठी आपला सहभाग गरजेचा आहे. राज्यघटनेमधून समता ,बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांना महत्त्व देण्यात आले आहे. या मूल्यांचा जागर होण्यासाठी राज्यघटना लिहिण्यात आली. या राज्यघटनेचा सन्मान राखणे आणि लोकशाही अधिक बळकट होण्यासाठी सर्व घटकांनी मोठ्या स्तरावर मतदान करावे .शंभर टक्के मतदान होणे ही आदर्श अवस्था आहे. भारतासारख्या देशात केवळ ६० टक्के किंवा ५५ टक्के मतदान होणे ही गोष्ट निश्चितच योग्य नाही. काही ठिकाणी तर ५० टक्के पेक्षा कमी मतदान होत आहे. ही गोष्ट एवढ्या मोठ्या लोकशाही देशात योग्य नाही. त्यामुळे जास्तीत जास्त मतदान होणे आवश्यक आहे.

श्री. कंठे म्हणाले, जास्तीत जास्त मतदान झाल्यानंतर आपल्याला व्यवस्थेकडून अपेक्षा ठेवण्यात येतात. वेगवेगळ्या सुविधा मिळवण्यासाठी आपण तेव्हाच आवाज उठवू शकतो जेव्हा आपण लोकशाही प्रक्रियेत भाग घेतो. म्हणूनच १००% मतदान करावे. आमच्या आव्हानाला दिव्यांग बांधव मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद देतील, अशी अपेक्षा आहे.

कंठे यांनी स्वागत केले आणि आभार मानले.

मोदींनी विकासाबरोबरच संस्कृती जपली व जोपासली - श्रीरंग बारणे

■ खासदार बारणे यांनी पिंजून काढला पनवेलचा ग्रामीण भाग

पनवेल/वार्ताहर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ देशात विकास पर्व आणले नाही तर भारतीय संस्कृती जपण्याचे व जोपासण्याचे कामही केले आहे. त्यामुळेच संपूर्ण जगात भारताची मान उंचावली आहे. आश्वासनांऐवजी कृतीवर भर असल्याने मोदी यांनी समस्त भारतीयांचा विश्वास जिंकला आहे, असे उद्गार मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आज (गुरुवारी) काढले.

खासदार बारणे यांनी आज प्रचार दौऱ्यात पवनेलचा ग्रामीण भाग पिंजून काढला. या दौऱ्यात वाजे येथे झालेल्या चौक सभेत बारणे बोलत होते. या दौऱ्यात पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे क्लस्टर प्रमुख बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भीमसेन माळी, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुण भगत, शिवसेनेचे तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, मनसेचे तालुका सचिव दिनेश मांडवकर तसेच प्रथमेश सोमण, सुरेश भोपे, सूरज पालकर, अक्षय म्हसकर, विकास नागे, भरत वाघ, बबन वाघ, सूरज करणूक, एकनाथ देसेकर, प्रल्हाद केणी, रामदास पाटील, दर्शन ठाकूर, भूपेंद्र पाटील, राजेंद्र पाटील, विद्याधर चोरगे आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.

खासदार बारणे म्हणाले की, सुमारे ५०० वर्षे जुना वाद निकाली काढत नरेंद्र मोदी यांनी अयोध्येत रामजन्मभूमी मंदिराची उभारणी करून जनभावनेला मूर्त स्वरूप देण्याचे काम केले. केवळ अयोध्याच नाही तर देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचा त्यांनी विकास केला. त्या माध्यमातून त्यांनी संस्कृती जपण्याचे व जोपासण्याचे कामही केले.

केंद्रात व राज्यात एकाच विचाराचे सरकार असणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार विविध लोकोपयोगी योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी झटत आहे. गेल्या पाच वर्षातील पहिली अडीच वर्षे सत्तेत असूनही विरोधी पक्षात असल्यासारखे वाटत होते. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून लोकांसाठी खूप काही करता आल्याचे समाधान आहे, असे बारणे म्हणाले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, खासदार बारणे यांनी गेल्या दहा वर्षात विकास कामांसाठी प्रचंड पाठपुरावा करून पनवेल तालुक्याला जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरोघर गॅस सिलेंडर, शौचालये, पिण्याचे पाणी दिले. देशात कुणीही उपाशी राहू नये यासाठी गोरगरिबांना मोफत धान्य वाटप करण्यात येत आहे. गरिबांची कदर करणारा हा पंतप्रधान आहे. महिलांना व शेतकऱ्यांना त्यांनी सन्मान दिला आहे. कोरोना काळात मोफत लस पुरवून तुम्ही आम्हाला त्यांनी जीवदान दिले आहे. तुमच्या आमच्या हिताचा विचार करणारे हे सरकार आहे.

काँग्रेसने केवळ आश्वासने दिली तर शेतकरी कामगार पक्षाने वर्षानुवर्षे मतदारांची केवळ फसवणूक केली, असा आरोपही आमदार ठाकूर यांनी यावेळी केला.

खासदार बारणे यांच्या विजयामध्ये पनवेलचा वाटा सिंहाचा असला पाहिजे, अशी अपेक्षा बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केली. पनवेल मतदारसंघातून बारणे यांना किमान एक लाखाचे मताधिक्य मिळेल, असा विश्वास अरुण भगत यांनी व्यक्त केला.

खासदार बारणे यांनी शेडुंग, बेलवली, लोणीवली, वांगणी, आंबिवली, नेरे, वाजे, शिवणसई, दुंदरे, रिटघर, वाकडी, खानाव, मोरबे, महालुंगी, चिंधण, पालेखुर्द, वावंजे आदी गावांचा प्रचार दौरा केला. फटाके वाजवून, पुष्पवृष्टी करीत त्यांचे स्वागत करण्यात आले. औक्षण करून त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

जरंडेश्वर साखर कारखान्याच्या थकित ऊस बिलासाठी शेतकरी आक्रमक

राजदंड / कोरेगाव

जरंडेश्वर शुगर मिल प्रायव्हेट लिमिटेड चिमणगाव ता. कोरेगाव जि. सातारा सदर कारखान्याने दोन महिने उलटून गेले तरी शेतकऱ्यांना ऊसाचे बिल दिले नसल्याने शेतकरी संघटना आक्रमक झाली असून व्याजा सहित शेतकरी वर्गाला परतावा मिळवण्यासाठी जिल्ह्याअधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे कि जरंडेश्वर शुगर मिल प्रायव्हेट लिमिटेड चिमणगाव ता. कोरेगाव जि. सातारा कारखान्याने दोन महिने उलटून गेले तरी शेतकऱ्यांना ऊसाचे बिल वाटप केले नाही. साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यावर १४ दिवसात बिलाची रक्कम जमा करावी अशी सूचना सर्व साखर कारखाने यांना दिलेल्या असुनही सातारा जिल्ह्यातील साखर कारखाने त्या सुचनेचे पालन करताना दिसत नाहीत.

दिनांक ७/०५/२०२४ पर्यंत जरंडेश्वर शुगर मिल प्रायव्हेट लिमिटेड व सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांची ऊस बिले शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यावर जमा झाली नाहीत तर शासनाच्या आदेशाप्रमाणे ऊस बिले + १५% व्याज दराने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याच्या तयारीला लागावो.अन्यथा कराड उत्तर विधानसभा शेतकरी संघटना आंदोलन सुरू करेल असा वसीम इनामदार कराड उत्तर शेतकरी संघटना अध्यक्ष यांनी दिला आहे.

यावेळी रघुनाथ दादा प्रणित शेतकरी संघटना, कराड उत्तर शेतकरी संघटना अध्यक्ष वसीम एम इनामदार, लक्ष्मण मोरे, शंकर कृष्ण जाधव, लक्ष्मण मारुती फरांदे, बबन दिघे, पिंटू पडवळ, मारुती यादव, सयाजी उबाळे, किरण नलवडे, लाला घोरपडे, हनुमंतराव मोरे,विनायक भोसले, मयूर जाधव उपस्थित होते.

निवडक महामुंबई

तीन आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई : राज्य सरकारने तीन वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंग देओल यांची मंत्रालयात अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिवपदी बदली करण्यात आली आहे. तर देओल यांच्या जागी अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन यांना पाठविण्यात आले असून मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाच्या प्रधान सचिव आणि विशेष चौकशी अधिकारी (२) म्हणून अंशू सिन्हा यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे.

दोन अपघातांत महिलेसह दुचाकीस्वाराचा मृत्यू

मुंबई : गुरुवारी दिवसभरात मुंबई शहरात झालेल्या दोन अपघातात एका महिलेसह दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. अर्चना अजय अंबेकर आणि श्याम श्रीलाल विश्वकर्मा अशी या दोन मृतांची नावे आहेत. याप्रकरणी बांगुरनगर आणि समतानगर पोलिसांनी दोन स्वतंत्र अपघाताची नोंद केली आहे. यातील एका गुन्ह्यातील आरोपी डंपरचालक अमर किसन घायावत याला बांगुरनगर पोलिसांनी अटक केली. गोरेगाव येथे राहणारी अर्चना गुरुवारी दुपारी काम आटोपून घरी जात होती. त्याचवेळी न्यू लिंक रोड, शास्त्रीनगरच्या विबग्योर हायस्कूलसमोरून रस्ता क्रॉस करताना तिला एका डम्परने धडक दिली आणि त्यात तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर आरोपी डंपरचालक अमर घायावत याला लोकांनी पकडून बांगुरनगर पोलिसांच्या स्वाधीन केले. कांदिवलीतील ठाकूर व्हिलेजजवळील ब्रिजवर झालेल्या दुसऱ्या अपघातात, भरवेगात जात असताना श्याम विश्वकर्मा याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि त्याने दुचाकीची डिवायडरला धडक दिली होती. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला होता.

हुंड्यासाठी पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीला अटक

मुंबई : हुंड्यासाठी पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गोरक्षनाथ भगवान भोजने या आरोपी पतीला पार्कसाइट पोलिसांनी अटक केली आहे. या गुन्ह्यात तिघांना पाहिजे आरोपी दाखविण्यात आले असून त्यात गोरक्षनाथचे वडील भगवान दिनभाऊ भोजने, आई मंदा भगवान भोजने आणि बहीण स्नेहा भगवान भोजने यांचा समावेश आहे. या चौघांच्या छळाला कंटाळून वैष्णवीने आत्महत्या केल्याचा आरोप आहे. वैष्णवीचा गोरक्षनाथसोबत डिसेंबर २०२२ रोजी पुण्यात विवाह झाला होता. विवाहाच्या सहा महिन्यानंतर भोजने कुटुंबीय तिचे हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक शोषण करत होते. तिने माहेरहून फ्लॅटसह दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पैसे आणावेत म्हणून तिचा ते सर्वजण छळ करत होता. काही दिवसांपूर्वी तिच्या पतीने तिचा गर्भपात केला होता. तेव्हापासून तिची प्रकृती प्रचंड बिघडली होती. त्यातून आलेल्या मानसिक नैराश्यातून रविवारी २१ एप्रिल २०२४ रोजी वैष्णवीने तिच्या विक्रोळीतील राहत्या घरी आत्महत्या केली होती. वैष्णवीची आई कविता रामदास बुळे हिने याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. गुन्हा दाखल होताच आरोपी पती गोरक्षनाथ भोजणे याला पार्कसाईट पोलिसांनी अटक केली होती.

बोरिवली येथे नोकराकडून २७ लाखांची चोरी

मुंबई : बोरिवली येथे एका नोकरानेच त्याच्या व्यावसायिक मालकाची सुमारे २७ लाखांची रोकड चोरी करून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अरुणकुमार अकलेश राऊत या २३ वर्षांच्या आरोपी नोकराविरुद्ध एमएचबी पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदविला आहे. चोरीनंतर पळून गेलेल्या अरुणकुमारचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. सुरतचे तक्रारदार व्यावसायिक यांच्याकडे अरुणकुमार गेल्या दोन वर्षांपासून नोकरीला होता. त्यांना सुरत शहरात एक नवीन हॉटेल सुरू करायचे होते. त्यासाठी लागणारे साहित्य ते मुंबईसह भिवंडी येथून मागविणार होते. त्यासाठी ते दोन दिवसांपूर्वी त्यांच्या बोरिवलीतील फ्लॅटमध्ये अरुणकुमार आले होते. गुरुवारी ते भिवंडी येथे कामासाठी निघून गेले. यावेळी त्यांचा नोकर फ्लॅटमध्ये एकटाच होता. सायंकाळी चार वाजता ते घरी आले असता तिथे अरुणकुमार नव्हता. त्याचा मोबाईल बंद येत होता. हा प्रकार संशयास्पद वाटताच त्यांनी लॉकरमधील कॅशची पाहणी केली असता तिथे २७ लाखांची कॅश नव्हती. त्यांचा नोकर लॉकरमधून २७ लाखांची कॅश घेऊन पळून गेल्याची खात्री होताच त्यांनी एमएचबी पोलिसांना घडलेला प्रकार सांगून अरुणकुमार राऊत याच्याविरुद्ध चोरीची तक्रार केली.

महाकाय गर्डर अवघ्या सव्वा तासांत लाँच

वांद्रे-वरळी सी-लिंक जोडणी यशस्वी

मिशन फत्ते होताच 'हिप हिप हुर्रे' आणि टाळ्यांचा गजर

खुल्या समुद्रात दोन मार्ग जोडणारे शिवधनुष्य पालिकेने पेलले

कोस्टल रोड प्रकल्पात भारतातील पहिला अभियांत्रिकी आविष्कार

मुंबई : कोस्टल रोड प्रकल्पातील सर्वांत आव्हानात्मक टप्पा म्हणजे वांद्रे वरळी सी-लिंकला जोडणारा दोन हजार मेट्रिक टन वजनाचा महाकाय 'बो स्ट्रिंग आर्च गर्डर' अवघ्या सव्वा तासांत बसवण्यात आला. समुद्रातील भरती व ओहोटीचे चॅलेंज स्वीकारत शुक्रवारी पहाटे २ ते ३.२५ वाजताच्या दरम्यान महाकाय गर्डर यशस्वीपणे बसवण्यात आला. विशेष म्हणजे समुद्रातील देशातील हा प्रयोग यशस्वी पार पाडत पालिकेने शिवधनुष्य पेलले. कोस्टल रोड प्रकल्पातील हा अभियांत्रिकी आविष्कार घडल्याने 'ऑन द स्पॉट' उपस्थित असलेल्या पालिका आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी कोस्टल रोड प्रकल्पातील टीमचे कौतुक केले.

मुंबईतील वाहतूककोंडी फोडण्यासाठी कोस्टल रोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मुंबई महापालिकेचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून यातील आव्हानात्मक टप्पा म्हणजे वांद्रे-वरळी सी-लिंक जोडणी. शुक्रवारी पहाटे २ वाजेपासून या मोहिमेला सुरुवात झाली आणि पहाटे ३ वाजून २५ मिनिटांनी हे मिशन यशस्वीपणे पार पडले. या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उपआयुक्त (विशेष अभियांत्रिकी) चक्रधर कांडलकर, प्रमुख अभियंता (मुंबई किनारी रस्ता प्रकल्प) गिरीश निकम, 'एचसीसी'चे उपाध्यक्ष अर्जुन धवन, मोहिमेचे प्रमुख संतोष राय आदींसह अभियंते उपस्थित होते.

एकूण १०.५८ किलोमीटर लांब असलेल्या मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील अतिशय आव्हानात्मक टप्पा म्हणजे मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्गाची सांधणी. त्यासाठी पालिका प्रशासनाने अतिशय नियोजनबद्ध तयार केली. या दोन्ही टोकांना सांधणारा पहिला बो आर्च स्ट्रिंग गर्डर बुधवारी दुपारी माझगाव डॉक येथून मार्गस्थ झाला आणि गुरुवारी पहाटे चार वाजता वांद्रे-वरळी सागरी सेतूजवळ पोहोचला.

सिमेंट काँक्रीटीकरणचा लेप

मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू दरम्यान स्थापन करण्यात आलेल्या तुळईवर पुढील टप्प्यात सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या तुळईला गंज चढू नये यासाठी सी-५ या जपानी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच अतिशय प्रगत वेल्डिंग तंत्रज्ञानाद्वारे तुळईचे सुटे भाग एकमेकांना जोडण्यात आले आहेत.

बेअरिंगचा वापर करून त्यावर तुळई स्थिरावणार

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील वरळीकडील बाजू आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्गाची मुंबई किनारी रस्त्याला मिळणारी बाजू येथे प्रत्येकी दोन मेटिंग कोन आणि दोन मेटिंग युनिट बसविण्यात आले आहेत. या मेटिंग कोन आणि युनिटची योग्य सांगड बसविण्यात आली आहे. हे मेटिंग युनिट २ मीटर व्यास आणि मेटिंग कोन १.८ मीटर व्यासाचे आहेत. यानंतर मेटिंग कोन आणि युनिट असलेल्या चारही कोपऱ्यांवर जॅक बसविण्यात येतील. तसेच जॅक कार्यान्वित केल्यानंतर मेटिंग कोन आणि युनिट काढून घेण्यात येणार आहेत. पुढच्या तांत्रिक प्रक्रियेत बेअरिंगचा वापर करून त्यावर तुळई स्थिरावणार आहे. त्यानंतर जॅकदेखील काढून घेण्यात येणार आहेत.

संयम आणि कौशल्य पणाला लावणारी १ तास २५ मिनिटे

प्रवाहकीय हवामानानुसार अंदाज घेऊन पहाटे २ वाजेपासून गर्डर स्थापनेची कार्यवाही सुरू करण्यात आली. त्यानंतर बार्जच्या मदतीने टप्प्याटप्प्याने तुळई मुंबई किनारी रस्ता आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्गाच्या मधोमध आणली. सागरी लाटांचा आणि वाऱ्याच्या वेगाचा अंदाज घेत अभियंत्यांनी कौशल्य पणाला लावत सुयोग्य स्थितीत तळईला स्थिर केले. किनारी रस्त्याच्या कडेला दोन आणि वांद्रे-वरळी सागरी सेतू मार्गाच्या कडेला दोन असे चार मेटिंग युनिट तयार करण्यात आले आहेत. त्या मेटिंग युनिटमध्ये तुळईचे चारही कोपऱ्यांना असलेले पांढऱ्या रंगाचे मेटिंग कोन ठीक ३ वाजून २५ मिनिटांनी अचूकपणे बसविण्यात आले. चारही मेटिंग कोन आणि मेटिंग युनिटची सांगड बसताच उपस्थित अधिकारी, अभियंते आणि कामगारांनी 'हिप हिप हुर्रे'चा जयघोष करत आणि टाळ्यांच्या गजरात मोहीम फत्ते झाल्याचा आनंद व्यक्त केला.

अंबाला ते मुंबई प्रवास

बो स्ट्रिंग आर्च गर्डर ही वरळीकडून नरिमन पाईंट दिशेला जाणाऱ्या मार्गावर स्थापन करण्यात आली. ही तुळई दोन हजार मेट्रिक टन वजनाची असून, १३६ मीटर लांब आणि १८ ते २१ मीटर रुंद आहे. अंबाला (हरयाणा) येथे या तुळईचे छोटे छोटे सुटे भाग तयार करण्यात आले आहेत. तेथून तब्बल ५०० ट्रेलरच्या मदतीने हे सुटे भाग दाखल आले. सुटे भाग एकत्र जोडून नवी मुंबईतील न्हावा बंदरातून तराफाच्या मदतीने ही तुळई वरळी येथे आणली.

धारावी पुनर्विकासाबाबत आक्षेप याचिका

अदानीला कंत्राट देण्याच्या निर्णयाविरोधातील याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास हायकोर्टाचा नकार

मुंबई : आशिया खंडातील सर्वात मोठ्या झोपडपट्टीपैकी एक असलेल्या धारावीच्या पुनर्विकासाचे कंत्राट अदानी समूहाकडे सोपविण्याच्या निर्णयाविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर तातडीने सुनावणी घ्या, अशी विनंतीच याचिकाकर्त्यांनी केली. गेली दोन वर्षे केवळ तारीख पे तारीख दिली जाते. सुनावणी घेऊन प्रकल्पाचे सुरू केलेले काम कोर्टाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहिले, असा तरी आदेश द्या, अशी विनंतीही केली. याची दखल घेत खंडपीठाने असा निर्णय दिल्यानंतर काय फरक पडणार? अशी विचारणा याचिकाकर्त्यांला केली. तसेच याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार देत सुनावणी उन्हाळी सुट्टीनंतर जूनच्या दुसऱ्या आठवड्यात याबाबतची सुनावणी निश्चित केली.

धारावी झोपडपट्टीच्या पुनर्विकासासाठी राज्य सरकारने ५०६९ कोटींच्या बोलीवर अदानी समूहाला मंजुरी दिली. मात्र सरकारने त्यापेक्षा मोठी असलेली ७२०० कोटींची बोली नाकारून पक्षपाती आणि मनमानी निर्णय घेतला, असा दावा करीत 'सेकलिंक' या सौदी अरेबियाच्या कंपनीने पुनर्विकास प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेला उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. राज्य सरकारची भूमिका ही संशयास्पद आहे. सेकलिंक कंपनीला पुनर्विकास प्रकल्पातून दूर करण्यासाठीच पात्रता निकषांच्या अटींमध्ये बदल करण्यात आला आहे, असा आरोप करताना मंत्रिमंडळ निर्णयांच्या नोंदी आणि अदानी समूहाला कंत्राट दिलेले सरकारी ठराव मागवून ते रद्द करावेत, अशी विनंती करणारी याचिका दाखल केली आहे. प्रकल्पाचे काम सुरू असल्याने याचिकेवर तातडीने सुनावणी घेऊन खंडपीठाने प्रकल्पाचे सुरू केलेले काम कोर्टाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहिले असा तरी आदेश द्यावी, अशी विनंती केली. ही विनंती खंडपीठाने फेटाळून लावत याचिकेची सुनावणी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात निश्चित केली.

मध्य रेल्वेचा रविवारी मेगाब्लॉक

मुंबई : रेल्वे रूळ, सिग्नल आणि ओव्हरहेड उपकरणांच्या देखभालीचे काम करण्यासाठी मध्य रेल्वेने मुख्य आणि हार्बर मार्गावर रविवार २८ एप्रिल रोजी मेगाब्लॉक घेतला आहे. ठाणे-कल्याण अप आणि डाऊन धीम्या मार्गावर ब्लॉक असल्याने कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांची गैरसोय होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सकाळी ११ ते सायंकाळी ५ दरम्यान सुटणाऱ्या आणि येणाऱ्या सर्व अप आणि डाऊन धीम्या सेवा नियोजित वेळेपासून १० मिनिटे उशिराने धावतील. ब्लॉक कालावधीत सकाळी १०.४३ ते दुपारी ३.४४ वाजेपर्यंत मुलुंड येथून सुटणाऱ्या डाऊन धीमी-सेमी जलद सेवा मुलुंड आणि कल्याण स्थानकांदरम्यान ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली स्थानकावर थांबतील. या लोकल वेळापत्रकानुसार १० मिनिटे विलंबाने धावणार आहेत.

सकाळी १०.३६ ते दुपारी ३.५१ पर्यंत कल्याण येथून सुटणाऱ्या अप, धीम्या-सेमी जलद सेवा कल्याण आणि मुलुंड स्थानकांदरम्यान अप जलद मार्गावर वळवण्यात येतील. पुढे डोंबिवली, दिवा, मुंब्रा, कळवा, ठाणे स्थानकांदरम्यान अप धीम्या मार्गावर थांबतील.

हार्बर मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-चुनाभट्टी/वांद्रे डाऊन हार्बर मार्गावर सकाळी ११.४० ते दुपारी ४.४० पर्यंत आणि चुनाभट्टी/वांद्रे-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अप हार्बर मार्गावर सकाळी ११.१० ते दुपारी ४.१० पर्यंत ब्लॉक असेल.

- ब्लॉक कालावधीत पनवेल ते कुर्ला दरम्यान विशेष सेवा चालवल्या जातील.
- हार्बर मार्गावरील प्रवाशांना सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या कालावधीत मुख्य मार्गावर आणि पश्चिम रेल्वेमार्गे प्रवास करण्याची परवानगी आहे.

वसई रोड यार्ड येथे दिवा लाईनवर नाइट ब्लॉक

पश्चिम रेल्वे मार्गावर अभियांत्रिकी आणि देखभालीच्या कामासाठी वसई रोड यार्ड येथे २७-२८ एप्रिल रोजी मध्यरात्री ००.१५ ते पहाटे ३.१५ या वेळेत अप आणि डाऊन दिवा मार्गावर तीन तासांचा मोठा जम्बो ब्लॉक घेण्यात आला आहे. त्यामुळे रविवार २८ एप्रिल रोजी पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय विभागात दिवसा कोणताही ब्लॉक असणार नाही.

दहिसर स्कायवॉकची फक्त डागडुजी

मुंबई : दहिसर पश्चिमेकडील स्कायवॉकच्या दुरुस्तीसाठी तीन सल्लागारांचा सल्ला घेण्यात आला. सल्लागाराच्या सल्ल्यानुसार स्कायवॉकची पुनर्बांधणी करणे अपेक्षित होते. मात्र पालिकेने सल्लागाराच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष करत कंत्राटदारावर भरोसा ठेवला आहे. कंत्राटदारावर भरोसा ठेवला असताना कंत्राटदाराने स्कायवॉकची डागडुजी करण्यात धन्यता मानली आहे.

तीन सल्लागार, तरी कंत्राटदारावर भरोसा

दहिसर पश्चिम लोकमान्य टिळक मार्गावरील स्थानकाजवळ एमएमआरडीएने बांधलेला स्कायवॉक २०१५ मध्ये पालिकेच्या ताब्यात दिला आणि २०१६ मध्ये स्कायवॉकचा काही भाग कोसळला. त्यामुळे महापालिकेने या स्कायवॉकची संरचनात्मक तपासणी करण्यासाठी व्हीजेटीआयची नियुक्ती केली. व्हीजेटीआयने अहवालामध्ये स्कायवॉकचा जीर्ण स्लॅब तोडून मुख्य संरचनात्मक दुरुस्ती करण्याचे सुचविले होते. मात्र पालिकेने पुन्हा या स्कायवॉकची तपासणीसाठी एससीजी कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या सल्लागाराची नेमणूक केली. या सल्लागाराने ७ नोव्हेंबर २०२२ रोजी लेखापरीक्षण अहवाल सादर केला.

अहवालानुसार स्कायवॉकच्या ८ पैकी ७ जिन्यांसह स्कायवॉक डेक स्लॅब धोकादायक अवस्थेत असल्याने ते बांधकाम पाडून त्याची पुनर्बांधणी करण्याची शिफारस केली. त्यानुसार महापालिकेने या पुलाच्या पुनर्बांधणीच्या कामाचा आराखडा, नियोजन, संकल्पचित्रे, अंदाजपत्रक व मसुदा निविदा बनवण्यासाठी फेमस्ट्रक्ट कन्सल्टिंग इंजिनिअरिंग एलएलपी यांची तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केली. त्यानुसार निविदा मागवून पात्र कंपनीची निवड केली. या कामासाठी स्वस्तिक कस्ट्रक्शन कंपनीची निवड करण्यात आली. सल्लागाराने सल्ला दिला तरी कंत्राटदाराची नियुक्ती केली. मात्र स्कायवॉकची पुनर्बांधणी करण्याऐवजी कंत्राटदाराने डागडुजीवर भर दिला आहे.

मजबूत सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधणीचे ट्रेनिंग

आयआयटी मुंबई देणार ३०० अभियंत्यांना धडे

मुंबई : मुंबईतील रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे रस्ते करण्यावर पालिका प्रशासनाने जोर दिला आहे. सिमेंट काँक्रीटचे रस्ते बांधणी करताना काय करावे, काय करू नये, फिल्डवर काम करणाऱ्या अनुभवी अभियंत्यांच्या शंकांचे निरसन करण्यात येणार आहे. आयआयटीचे स्थापत्य अभियांत्रिकीचे नामांकित तज्ज्ञ प्रा. डॉ. के. व्ही. कृष्णराव दोन सत्रात ३०० अभियंत्यांना तंत्रशुद्ध व शास्त्रशुद्ध ट्रेनिंग देणार आहेत. उद्या शनिवार व ४ मे रोजी पवई येथील भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी, मुंबई) येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत कार्यशाळा होणार आहे.

सिमेंट काँक्रीटीकरण रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेतली आहेत. रस्ते काँक्रीटीकरणाची कामे दर्जेदार व्हावीत, यासाठी महानगरपालिका प्रशासन विविध उपाययोजना राबवित आहे. त्याचाच एक भाग म्हणून रस्ते बांधणीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा, रस्ते बांधणी करताना काय करावे, काय करू नये तसेच प्रत्यक्ष 'फिल्ड'वर काम करणाऱ्या अनुभवी अभियंत्यांच्या शंकांचे निरसन व्हावे, यासाठी पालिका प्रशासनाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

पालिकेने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रमुख रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्याचे धोरण आखले आहे. त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी अभियंता वर्ग अविरत कार्यरत आहेत. काँक्रीट रस्ते बांधणी कामे अधिक दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण व्हावीत, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, तांत्रिक ज्ञान दैनंदिन कार्यप्रणालीत सुधारणा या विविध पैलूंची माहिती अभियंत्यांना व्हावी, यासाठी पालिका प्रशासनाने एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

विशेष ऑफर ; नवीन डिझाइन्स, दागिन्यांची विस्तृत श्रेणी

'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे उत्सवकाळानिमित्त 'सप्तम कलेक्शन'

पुणे : समृद्ध परंपरा असलेल्या व ग्राहकांप्रति विश्वासार्ह असलेल्या प्रतिष्ठित ज्वेलरी ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे उत्सवकाळानिमित्त 'सप्तम कलेक्शन'मधील नवीन डिझाईन्स सादर करण्यात आल्या आहेत. वर्षानुवर्षे दागिन्यांमधील उत्कृष्टतेच्या वारशासह 'पीएनजी ज्वेलर्स'ने कलाकुसर व अभिनवता याबाबत आपली कटिबद्धता कायम ठेवत सणासुदीच्या काळासाठी दागिन्यांची विस्तृत श्रेणी सादर केली आहे.

'सप्तम कलेक्शन'ने सुरुवातीपासूनच ग्राहकांची पसंती मिळवली आहे. या कलेक्शनमधील उत्कृष्ट कलाकुसर व कालातीत डिझाईन्सचे ग्राहकांनी कौतुक केले आहे. दिवाळी २०२३ यामध्ये मिळालेल्या यशानंतर पुन्हा एकदा उत्सवकाळानिमित्त नवीन दागिन्यांची श्रेणी सादर करण्यात आली आहे. या कलेक्शनमध्ये कुंदन, जडावू, हिरे व पारंपरिक सोन्यामध्ये तयार करण्यात आलेले हार, कानातले,

अंगठी, ब्रेसलेट इत्यादी उत्कृष्ट दागिन्यांची विस्तृत श्रेणी पाहायला मिळणार आहे.

नवीन 'सप्तम कलेक्शन'विषयी माहिती देताना 'पीएनजी ज्वेलर्स'चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले की, "नवीन 'सप्तम कलेक्शन' हे एकता, प्रेम, उत्सवाची भावना, समृद्धी, नवी सुरुवात, उत्साह व सौंदर्यतेचे प्रतिबिंब आहे, जे या मूळ संकल्पनेवर आधारित आहे. यंदाच्या उत्सवकाळासाठी आमच्या ग्राहकांना त्यांची आवडती शैली व पसंतीनुसार दागिने खरेदीचा अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहोत."

१५ मेपर्यंत कलेक्शन उपलब्ध

हे कलेक्शन 'पीएनजी ज्वेलर्स'च्या भारतभरातील सर्व दालनांमध्ये १५ मे २०२४ पर्यंत उपलब्ध असेल. या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'पीएनजी ज्वेलर्स'तर्फे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर २५ टक्क्यांपर्यंत सवलत व हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर फ्लॅट ५० टक्के सवलत मिळणार आहे. तसेच जुन्या सोन्याच्या दागिन्यांच्या एक्स्चेंजवर शून्य टक्के घट मिळणार आहे. या ऑफर्सद्वारे ग्राहकांना योग्य दरात उत्कृष्ट दागिने खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

गायरान जमिनीवरील अतिक्रमणे हटवा

हायकोर्टाची राज्य सरकारला नोटीस

मुंबई : गायरान जमिनीवरील अनधिकृत बांधकामे हटवा, अशी मागणी करीत नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने राज्य सरकारसह सर्व प्रतिवादींना नोटीस बजावून याचिकेची सुनावणी ७ मे रोजी निश्चित केली.

गावरान जमिनीवरील बेकायदा बांधकामाविरोधात येवला तालुक्यातील कैलास सोमसे यांच्यासह अन्य शेतकऱ्यांच्या वतीने ॲड. एकनाथ ढोकळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर प्राथमिक सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. ढोकळे यांनी येवला तालुक्यातील डोंगरगाव येथील जवळपास ८.०९ हेक्टर गायरान जमिनीवर अतिक्रमणे झाली आहेत. राजकीय प्रभावाचा वापर करून या ठिकाणी कायमस्वरूपी दुकानेही बांधली आहेत. त्या विरोधात गावकऱ्यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी करून कारवाई करण्याची मागणी केली. मात्र राजकीय दबावापोटी जाणूनबुजून टाळाटाळ करण्यात आली आहे. त्यामुळे गायरान जमिनी अतिक्रमणांसाठी मोकळे रान बनल्या आहेत.

या प्रकारे आहार घेतल्यास होऊ शकतात गंभीर आजार

हिंदू शास्त्रात आणि आयुर्वेदात भोजनसंबंधी काही माहिती देण्यात आली आहे. जसे कोणत्या वारी काय खावे आणि काय नाही, कोणत्या तिथीला खावे. तसेच कोणत्या महिन्यात काय खाणे टाळावे हे देखील विस्तारपूर्वक सांगण्यात आले आहे. खरं तर या मागे वैज्ञानिक कारण आहेत. प्रत्येक वार, तिथी किंवा महिन्यात हवामान बदलत असतं ज्यामुळे बदल जाणून घेता आहार बदल करणे गरजेचे आहे.

जसे की आपल्याला माहीतच असेल की रात्री दही खाणे टाळावे किंवा दुधासोबत मीठ खाणे टाळावे. कारण खाण्यात मेळ असणे गरजेचे आहे. तर जाणून घ्या कोणत्या महिन्यात काय खावे आणि काय नाही.

या संबंधित दोहे देखील प्रसिद्ध आहे

कोणत्या महिन्यात काय खाणे टाळावे-

।।चौते गुड़, वैशाखे तेल, जेठ के पंथ, अषाढ़े बेल।
सावन साग, भादो मही, कुवांर करेला, कार्तिक दही।
अगहन जीरा, पूसै धना, माघै मिश्री, फाल्गुन चना।
जो कोई इतने परिहरै, ता घर बैद पैर नहिं धरै।।।

कोणत्या महिन्यात काय खावे-

।।चैत चना, बैसाखे बेल, जैठे शयन, आषाढ़े खेल, सावन हर्रे, भादो तिल।
कुवार मास गुड़ सेवै नित, कार्तिक मूल, अगहन तेल, पूस करे दूध से मेल।
माघ मास घी-खिचड़ी खाय, फागुन उठ नित प्रात नहाय।।

१. चैत्र मास

हा महिना इंग्रजी कॅलेंडरनुसार मार्च-एप्रिल दरम्यान येतो. या महिन्यात चैत्र नवरात्री प्रारंभ होते. या महिन्यात गूळ खाणे टाळावे. चणे खाऊ शकतात.

२. वैशाख

हा महिना इंग्रजी महिन्यानुसार एप्रिल-मे दरम्यान येतो. वैशाख महिन्यात तेल लावण्यावर मनाही आहे. या महिन्यात तेलकट पदार्थ खाण्यास मनाई आहे.

३. ज्येष्ठ

मे-जून दरम्यान येणाऱ्या या महिन्यात दुपारी खेळण्यास मनाही केली आहे. या दरम्यान आपल्या देशात उन्हाची दाहकता चांगलीच जाणवते त्यामुळे बाहेर अति फिरणे आरोग्यासाठी हानिकारक ठरतं. या काळात आराम करणे योग्य ठरतं. या महिन्यात बेल खाऊ शकता.

४. आषाढ

जून-जुलै दरम्यान येणाऱ्या या महिन्यात पिकलेलं बेल खाणे टाळावे. या महिन्यात हिरव्या भाज्यांचे सेवन करणे टाळावे. या महिन्यात जोरदार व्यायाम करावा.

५. श्रावण

जुलै-ऑगस्ट दरम्यान येणाऱ्या श्रावण महिन्यात पालेभाजी खाणे टाळावे. हिरव्या भाज्या, दूध आणि दुधाने निर्मित वस्तू खाणे टाळावे. या महिन्यात हर्रे खाणे योग्य ठरेल. याला हरिद्रा किंवा हरडा देखील म्हणतात.

६. भाद्रपद

ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान येणाऱ्या भाद्रपद महिन्यात दही खाणे टाळावे. या दोन महिन्यांत ताक किंवा दह्याने निर्मित खाद्य पदार्थ खाणे टाळावे. या महिन्यात तीळ वापरावे.

७. आश्विन

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात कारली खाणे टाळावे. या महिन्यात दररोज गूळ खाणे योग्य ठरेल.

८. कार्तिक

हा महिना ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान येतो. कार्तिक महिन्यात

वांगी, दही आणि जिरं मुळीच खाऊ नये. या महिन्यात मुळा खावा.

९. मार्गशीर्ष

नोव्हेंबर-डिसेंबर या महिन्यात जेवणात जिरे वापरू नये. तेल वापरू शकता.

१०. पौष

डिसेंबर-जानेवारी या महिन्यात दूध पिऊ शकता, परंतु कोथिंबीर खाणे टाळावे.

११. माघ

जानेवारी-फेब्रुवारी या महिन्यात मुळा आणि कोथिंबीर खाणे टाळावे. या दरम्यान मिश्री देखील खाऊ नये. या महिन्यात खिचडीत तूप घालून खावे.

१२. फाल्गुन

फेब्रुवारी- मार्च या महिन्यात सकाळी लवकर उठावे. या महिन्यात चणे खाणे टाळावे.

ॲक्टिव्ह असतानाही दिसा ऑफलाईन; असे लपवा इन्स्टाग्रामवरील ॲक्टिव्ह स्टेटस

एरव्ही तुम्ही इन्स्टाग्रामवर ॲक्टिव्ह दिसत असताना कोणतेही चॅट, मेसेजेस टाळणे अवघड होऊन बसते, कारण यात तुम्ही ऑनलाईन किंवा अलीकडे ॲक्टिव्ह म्हणून दाखवले जात असल्याचा संदर्भ येतो. अशावेळी तुमच्या कामात व्यत्यय येऊ शकतो. तेव्हा तुम्ही इन्स्टाग्रामवर तुमचे स्टेटस कसे लपवू शकता याबद्दल येथे माहिती देत आहोत.

तुम्ही इन्स्टाग्रामवर एखाद्याला टाळत असाल किंवा फक्त कामावर लक्ष केंद्रित करू इच्छित असाल आणि मित्राने शेअर केलेल्या मीममुळे तुम्हाला त्रास नको असेल तर इन्स्टाग्राममध्ये एक फीचर आहे जे या परिस्थितीत उपयुक्त ठरू शकते. इन्स्टाग्राम आता युजर्सना इन्स्टाग्रामवर ऑफलाईन दिसण्याची परवानगी देते. हे फीचर तुम्हाला प्रायव्हसी देते. अनैच्छिक मेसेज टाळण्यास मदत करते आणि युजर्सना त्यांच्या ऑनलाईन उपस्थितीवर कंट्रोल घेऊ देते.

अँड्रॉइड आणि आयओएस उपकरणांवर इन्स्टाग्रामवर ऑनलाईन स्टेटस कसे लपवाल

तुम्ही तुमची इन्स्टाग्राम ॲक्टिव्हिटी प्रायव्हेट ठेवू इच्छित असल्यास, तुमचे ऑनलाईन स्टेटस लपवणे ही एक स्मार्ट ट्रिक आहे.

अँड्रॉइड आणि आयओएस युजर्ससाठी येथे एक साधे मार्गदर्शक आहे :

इन्स्टाग्राम ॲप उघडा.

तळाशी उजव्या कोपऱ्यात असलेल्या तुमच्या प्रोफाइल चित्रावर टॅप करा.

'मेसेज आणि स्टोरी रिप्लाय'वर टॅप करा.



'व्हू कॅन सी यू आर ऑनलाईन' अंतर्गत, तुम्हाला 'ॲक्टिव्ह स्टेटस दाखवा' दिसेल.

तो टॉगल बंद करा.

मोबाईल ब्राऊझरवर इन्स्टाग्रामवर ॲक्टिव्ह स्टेटस कसे बंद करावे/लपवावे

तुम्ही मोबाईल ब्राऊझरवर इन्स्टाग्राम वापरत आहात? काळजी नाही. तुम्ही अजूनही ॲक्टिव्ह स्टेटस लपवू शकतात.

तुमच्या मोबाईल ब्राऊझरवर इन्स्टाग्राम उघडा.

तळाशी उजवीकडे प्रोफाइल चिन्हावर टॅप करा.

वरती डावीकडे 'गियर' चिन्हावर टॅप करा.

'मेसेज आणि स्टोरी रिप्लाय' वर टॅप करा.

'व्हू कॅन सी यू आर ऑनलाईन' अंतर्गत, तुम्हाला 'ॲक्टिव्हिटी स्टेटस दाखवा' दिसेल.

'ॲक्टिव्ह स्टेटस दाखवा' टॉगल बंद करा.

लॅपटॉपवर स्टेटस कसे बंद करावे

तुम्ही तुमच्या लॅपटॉपवर इन्स्टाग्राम सर्फिंग करता का? तरीही तुम्ही तुमचे ॲक्टिव्ह स्टेटस सहज लपवू शकता.

तुमच्या वेब ब्राऊझरवर इन्स्टाग्राम उघडा.

उजवीकडे वरच्या बाजूला प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.

'व्ह्यू आर्किव्ह'च्या पुढील 'सेटिंग्ज'वर क्लिक करा.

'सेफ्टी अँड प्रायव्हसी' निवडा.

खाली स्क्रोल करा आणि 'मेसेज व स्टोरी आन्सर' निवडा.

'ॲक्टिव्ह स्टेटस दाखवा'वर क्लिक करा.

तो टॉगल बंद करा.

सॅमसंगपेक्षा अर्ध्या किमतीत पण तेवढाच दमदार

नुबीयाचा पहिला फोल्डेबल फोन नुबीया फ्लिप लाँच

फेब्रुवारीमध्ये झालेल्या मोबाईल वर्ल्ड काँग्रेसमध्ये नुबीया फ्लिप स्मार्टफोन दाखवण्यात आला होता. आता हा फोल्डेबल डिवाइस चीनमध्ये सादर करण्यात आला आहे. याची प्रारंभिक किंमत २९९९ युआन (जवळपास ३५,२०३ रुपये) आहे.

जेडटीईच्या सबब्रँड नुबीयानं आपला पहिला फोल्डेबल स्मार्टफोन नुबीया फ्लिप चीनमध्ये सादर केला आहे. फेब्रुवारीमध्ये हा फोन सर्वप्रथम एमडब्ल्यूसीमध्ये दिसला होता. फोनची सर्वात मोठी खासियत आहे याची किंमत. सध्या मार्केटमध्ये जे फ्लिप फोन आहेत, सर्व प्रीमियम रेंजमध्ये येतात, तर नुबीया फ्लिप चीनमध्ये मिड प्रीमियम-रेंज सेगमेंटमध्ये सादर करण्यात आला आहे. याची प्रारंभिक किंमत २९९९ युआन (जवळपास ३५,२०३ रुपये) आहे. चला जाणून घेऊया नुबीया फ्लिपचे प्रमुख स्पेसिफिकेशन्स.

नुबीया फ्लिपची किंमत

मीडिया रिपोर्टनुसार, नुबीया फ्लिपच्या ८जीबी रॅमव २५६ जीबी मॉडेलची किंमत २९९९ युआन (जवळपास ३५,२०३ रुपये) आहे. १२ जीबी रॅम आणि २५६जीबी स्टोरेज व्हेरिएंटची किंमत ३२९९ युआन (जवळपास ३८,७१७ रुपये) आणि १२जीबी रॅम व ५१२जीबी स्टोरेज मॉडेलची किंमत ३६९९ युआन (४३,४११ रुपये) आहेत. हा डिवाइस कारमेल, मिल्क टी आणि टैरो अशा दोन ऑप्शनमध्ये मिळेल. नुबीया फ्लिपची प्री-बुकिंग सुरू झाली आहे. फोन ऑफिशियली १६ एप्रिलला लाँच केला जाईल.

नुबीया फ्लिप स्पेसिफिकेशन्स

नुबीया फ्लिप देखील पारंपरिक क्लॅमशेल डिझाइनसह येतो. फोन अनफोल्ड केल्यावर याची जाडी ७ एमएम आणि वजन २०९ ग्राम आहे, ज्यामुळे फ्लिप कॅटेगरीच्या लाइटवेट फोनमध्ये याचा समावेश होतो. रिपोर्ट्सनुसार, यात हाय-स्ट्रेंथ असलेला स्पेस-ग्रेड स्टीलच्या हिंजचा वापरण्यात आला आहे जी फोन २ लाखांपेक्षा जास्त फोल्ड आणि अनफोल्ड करू देते.

फोनच्या मागे राऊंड डिस्प्ले आहे, ज्याच्या चारही बाजूंना रिंग कॅमेरा आयलंड आहे. राऊंड ॲमोलेड डिस्प्ले १.४३ इंचाचा आहे आणि ४६६x४६६ पिक्सल रिझॉल्यूशनसह येतो. या डिस्प्लेवर नोटिफिकेशन्स येतात, ज्यामुळे वारंवार फोन अनफोल्ड करण्याची झंझट राहत नाही.

फोनचा फ्रंट डिस्प्ले ६.९ इंचाचा आहे. हा एक ॲमोलेड फोल्डेबल डिस्प्ले आहे आणि १२० हर्ट्झ रिफ्रेश रेटसह फुल एचडी प्लस रिझॉल्यूशनला सपोर्ट करतो. नुबीयाच्या पहिल्या फोल्डेबल फोनमध्ये क्वॉलकॉमचा स्नॅपड्रॅगन ७ जेन १ प्रोसेसर आणि अड्रेनो ६४४ जीपीयू देण्यात आला आहे. यात ४३१०एमएएचची बॅटरी आहे, जी ३३वॉट फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते. दावा आहे की, ७३ मिनिटांत बॅटरी झिरो ते १०० टक्क्यांपर्यंत चार्ज केली जाऊ शकते.

नुबीया फ्लिपमध्ये ५० मेगापिक्सलचा मेन रिअर कॅमेरा आहे, सोबत २ एमपीचा डेप्थ सेन्सर देखील देण्यात आला आहे. फ्रंट कॅमेरा १६ एमपीचा आहे. विशेष म्हणजे प्रायमरी कॅमेरा देखील सेल्फी व व्हिडीओ कॉल्ससाठी वापरता येईल.

घरात कोणत्या दिशेला राम दरबाराचा फोटो लावावा?

राम दरबार अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा याबद्दल देशभरातील लोक उत्सुक आहेत. भक्तिमय वातावरणात लोक श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करत आहेत आणि श्रीराम दरबाराचा फोटो घरोघरी लावत आहेत, पण श्रीराम दरबाराची स्थापना कशी करतात हे तुम्हाला माहिती आहे का? त्यांच्या फोटोपासून ते मूर्ती बसवताना बऱ्याच गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. श्रीरामाची मूर्ती किंवा श्रीराम दरबाराचा फोटो घरात लावल्याने कोणते शुभ लाभ होतात? हे जाणून घेणे ही महत्त्वाचे आहे.

जर तुम्हालाही घरामध्ये राम दरबाराचा फोटो किंवा मूर्ती लावायची असेल तर खूप चांगली कल्पना आहे, पण त्यासाठी तुम्हाला परिस्थिती, दिशा आणि वेळ याकडे पूर्ण लक्ष द्यावे लागेल. तरच त्याचे शुभ परिणाम दिसून येतील. श्रीराम दरबाराचा फोटो लावल्याने घरात सुख-शांती वाढते. पैशाशी संबंधित समस्याही संपुष्टात येतील.

राम दरबार म्हणजे काय?

हिंदू धर्मात श्रीराम दरबाराचे विशेष महत्त्व आहे. भगवान श्रीराम, माता सीता, भाऊ लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न तसेच भगवान हनुमानाचे परम भक्त हनुमान श्रीराम दरबारात येतात. कोणत्याही चित्रात ते सर्व एकत्र आहेत. त्याला राम दरबार म्हणतात.

ज्योतिषशास्त्रानुसार श्रीराम दरबार हे प्रेम आणि मैत्रीचे प्रतीक मानले जाते. त्यांचे चित्र किंवा मूर्ती स्थापित करणे खूप शुभ आहे. सनातन धर्म मानणारे बहुतेक लोक आपल्या घरी श्रीराम दरबाराचे चित्र ठेवतात.

घराच्या या दिशेला राम दरबाराचे चित्र लावावे

घरामध्ये श्रीराम दरबाराचे चित्र लावायचे असेल तर दिशा नक्की पहा. वास्तूनुसार राम दरबाराचे चित्र किंवा मूर्ती चुकीच्या दिशेला लावल्याने शुभ फल मिळत नाही. यामध्ये तुमच्या इच्छा देवापर्यंत पोहोचत नाहीत. अशी परिस्थिती टाळण्यासाठी प्रभू श्रीरामाच्या दरबाराचे चित्र नेहमी पूर्वेकडील भिंतीवर लावावे. या दिशेला राम दरबाराची मूर्ती बसवावी. असे केल्याने घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते. माणसाच्या आयुष्यात पैशाची कमतरता संपते.

तारीख व दिवस पाहूनच राम दरबाराचे चित्र लावावे

शुभ मुहूर्तावर श्रीराम दरबाराची मूर्ती किंवा चित्र ठेवल्याने शुभ फळ प्राप्त होते. ते लावल्यानंतर देवाची पूजा करावी. प्रसादाचे वाटप केले पाहिजे.

नियमित पूजा करावी

घरात राम दरबार उभारल्यानंतर त्याची नित्य विधीपूर्वक पूजा करावी. देवाला अन्न अर्पण करा आणि आपल्या इच्छा त्याच्यासमोर ठेवा. असे केल्याने घरात प्रेम वाढते. घरात आशीर्वाद आल्याने पैशाचा ओघ वाढतो.

केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळविण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.

केसांसाठी नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात. तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी :

डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे -

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मूळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.

रोज केसांना मसाज करावा-

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणंदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.

तेल लावताना या गोष्टी टाळाव्यात

तेल लावणं कधीही विसरू नका-

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळविण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.

तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये -

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

आजमावून पहा खोकल्यावरचा हा घरगुती उपाय

ऋतू उन्हाळ्याचा असो किंवा थंडीचा, खोकला हा कोणत्याही ऋतूमध्ये उद्भविणारा आहे. बहुतेक वेळा ऋतू बदलत असताना खोकल्याचा त्रास जाणवत असतो. अनेकांना वाढत्या प्रदूषणामुळेही खोकल्याचा त्रास होत असतो. तर काहींना एखाद्या ॲलर्जीमुळे खोकल्याचा त्रास होत असतो. या खोकल्यावर उपचार म्हणून अनेक घरगुती उपाय केले जात असतात. असाच एक घरगुती उपाय जाणून घेऊ या. या उपायाने खोकला त्वरित बरा होण्यास मदत होते.

खोकला बरा होण्यासाठी काढा बनविण्याकरिता एक चिमूट हळद, अर्धा इंच आल्याचा तुकडा, चार ते पाच तुळशीची पाने, एक कप पाणी, एक चमचा मध आणि थोडेसे ज्येष्ठमध इतक्या साहित्याची आवश्यकता आहे. हा काढा बनविण्यासाठी एक कप पाणी गरम करण्यास ठेवावे. त्यामध्ये हळद, आले आणि तुळशीची पाने घालावीत. पाणी अर्धे राहीपर्यंत उकळू द्यावे. त्यानंतर ते पाणी गॅसवरून खाली उतरवून त्यामध्ये मध घालावे.

जर घसा खवखवत असेल किंवा दुखत असेल, तर या मिश्रणामध्ये थोडे ज्येष्ठमधही घालावे. हा तयार काढा दिवसातून दोन वेळा घ्यावा. या काढ्यामुळे खोकला बरा होण्यास मदत होतेच, त्याशिवाय घशातील इन्फेक्शनही याने दूर होते. तसेच या काढ्याच्या नियमित सेवनाने वारंवार होणारा खोकला टाळता येतो.

फळ आणि भाज्यांवरील कीटकनाशके कशी घालवाल

प्रदूषणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे हवेत मोठ्या प्रमाणात धुळीचे कण आढळतात. आपण मुख्यतः भाज्या आणि फळे रस्त्यावरून खरेदी करतो. या भाज्या आणि फळे नुसते एकदा साध्या पाण्यात धुतल्याने त्यातील फक्त २० टक्के कीटकनाशके नष्ट होतात आणि ८० टक्के कीटकनाशके भाज्यांवर तसेच असतात. त्यामुळे पोटाचे विकार उद्भवतात. तसेच ऑरगॅनिक फूड असले तरी पिकवताना कीटकनाशक वापरलेली असू शकतात. तर जाणून घ्या कसे स्वच्छ कराल फळं आणि भाज्या.

फळं आणि भाज्या एका कंटेनरमध्ये पुरेशा पाण्यात एकत्र करून घ्या. यात एक मोठा चमचा व्हिनेगर मिसळा. १५ मिनिटे ते तसेच राहू द्या. नंतर फळं-भाज्या काढून चांगल्या धुवून घ्या.

एका स्प्रे बॉटलमध्ये तीन भाग पाणी आणि एक भाग व्हिनेगर मिसळून वापरा. व्हिनेगर ९८ टक्के कीटकनाशके घालवण्यात मदत करते. पाण्यात बेकिंग सोडा मिसळून फळं आणि भाज्या १५ मिनिटांसाठी असेच राहू द्या. नंतर फळं-भाज्या काढून चांगल्या धुवून घ्या. बेकिंग सोड्याने १०० टक्के हानिकारक घटक साफ होतात.

भाज्या आणि फळभाज्या शिजवून घेणे सर्वात उत्तम ठरेल आणि फळं सोलून खाणे योग्य ठरेल.